म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

सन

लेखक आर. एन. रत्नपारखे

पुस्तकाचें नांव धर्मकाजर मों

मासिक पुस्तक.

# घटकाभर मौज

किंवा

## विविध रंग रस कथासंग्रह.

एप्रील गोष्ट २ री.

## विचित्रपालाची विचित्र जादू.

आर. एन. रत्नपारखे.

यांनी

मुंबईत:—पुराणप्रकाश आणि गोरक्षण छा० छा०

सन १८९६.

किंमत ४॥ आणे.

# पुराणप्रकाश.

(महाभारत व पुराणग्रंथांचें सरळ मराठी भाषांतर.)

हल्लींच्या विद्याप्रसारामुळें जुन्या व नव्या मतांच्या लोकांस, आपल्या प्राचीन पुराणादिग्रंथांत काय तत्व आहे व त्यांत कोण कोणत्या गोष्टी सांगितल्या आहेत, हें समजून घेण्याची बरीच उत्कंठा प्राप्त झाली आहे. असें जाणून सर्वांस घेण्यास सोईवार पडावें ह्मणून आह्मी श्रीमहाभारतादि १८ महा पुराणें व उपपुराणें यांचें सरळ मराठी भाषांतर शके १८१७ च्या आषाढ शु० ११ पासून दरमहा ९६ पृष्ठांच्या मासिक अंकद्वारें सुरू केलें आहे.

पुराणांत अनेकप्रकारचे इतिहास, मनोरंजक व उपयुक्त आख्यानें, बोधपर व नीतिपर मनोहर कथा, ईश्वराच्या अनेक अवतारकथा, सूर्यवंशीं व सोमवंशीं राजे कोणकोणते झाले, सृष्टि कशी उत्पन्न झाली, तीर्थें कोणतीं आहेत, त्यांचीं महात्म्यें कशीं आहेत त्यांचीं क्षेत्रें कोठें आहेत, मन्वंतराच्या कथा, कांहीं अद्भुत चमत्कारांच्या गोष्टी, पुढील भविष्यें, कोणते दिवस पवित्र व त्य दिवशीं कोणतीं व्रतें व दानें करावीं, वर्णाश्रमधर्म. श्राद्ध, मोटमोठ्या यज्ञांचे इतिहास, ग्रह, नक्षत्र, भूगोल, खगोल, स्वर्ग, मृत्यु, पाताळ सप्तद्वीपें, व नवखंडादिकांचीं वर्णनें. देव, दानव, गंधर्व. यक्ष, राक्षस नागांचीं उत्पत्ति असून सर्व उपयुक्त गोष्टींचा समावेश केला आहे.

तूर्त **भारताचीं** पृष्ठें ४०, **गणेशपुराणाचीं** २४, **वराहपुराणाचीं** १६ आणि **नृसिंहपुराणाचीं** १६ याप्रमाणें दरमहा रॉयल अष्टपत्री ९६ पृष्ठें प्रसिद्ध होत असतात.

याच्या प्रत्येक अंकाची किंमत ८आणे प्रमाणें वर्षाच्या १२ अंकाची किंमत आगाऊ देणारास ६ रुपये व ट. ख. १२ आणे पडेल.

**ता. क.**—जर कोणास वर्षाच्या १२ ही अंकाची किंमत एकदम देण्याची सवड नसेल तर प्रत्येक तिमाहीचे ट. ख. सह १॥= आगाऊ पाठवावी. अधिक माहिती करितां अर्धा आण्याचें तिकीट पाठवा.

**पुराणप्रकाश छापखान्याचे मालक,**

**पत्ताः**—नळबजार तीनबत्ती शेट छबीलदास लल्लूभाईचे घरांत.

**पुराणप्रकाशक मंडळी मुंबई.**

# मोहक जादु

## किंवा

# सकुमार सुंदरीचें अंतःकरण.

अत्यंत सुप्रसिद्ध व कीर्तिसंपन्न **राजा विक्रम** अनेक प्रसंगीं वेशांतर करून, आपल्या राज्यांत व राजधानीच्या शहरीं वेळीं-अवेळीं फिरून, आपल्या प्रजेच्या हालहावालाची चौकशी करीत असे. अशा अनेक गोष्टी आमच्या वाचकांच्या ऐकण्यांत व वाचनांत आल्या असतीलच. त्याचप्रमाणें एकेदिवशीं **विक्रम राजा** आपल्या मुख्य प्रधानासह बैराग्याचा वेश घेऊन, शहरांतून प्रजेच्या स्थितीचें अवलोकन करीत फिरत असतां त्यास वेड्यांचा दवाखाना आढळला. तें स्थल पाहतांच **राजा विक्रमाच्या** मनांत त्या इमारतीची अंतःस्थिती पाहाण्याचें आलें. व तो लागलेच आपल्या प्रधानासह त्या वेड्यांच्या कारागृहांत गेला. आणि त्यांतील निरनिराळ्या कारणांनीं वेड लागलेल्या लोकांची स्थिती व त्यांचें चित्रविचित्र प्रकारचें वर्तन व चाळे पाहून, त्यांच्या मनांत नानाप्रकारच्या कल्पना येऊं लागल्या होत्या. त्या विषयीं ज्या आधारानें आह्मीं पुढील कथानक सांगतों, यांत अत्यंत विस्तृत रीतीनें वर्णन केलें आहे. परंतु आह्मीं मागील खेपेस आपल्या वाचकांस मुख्यत्वें त्यांचें मनरंजन करित असतां त्यांस मानवस्वभावाचीं विचित्र चळनवळनें मनुष्याच्या मनांतील गुप्तविचार व त्याच्या अंतःकरणाचें खरें रहस्य हीं जाणण्याची उत्तम कला शिकवून, सुशिक्षण व व्यवहार ज्ञान प्राप्त करून द्यावयाचें, असा आमचा कृत संकल्प आहे, असें सांगितलें होतें. व आमचें कथानक वाचकां समोर ठेवण्यास जें स्थल आहे तें फार संकोचित आहे हें आमच्या रसज्ञ वाचकांच्या लक्षांत असेलच. यास्तव इतर पाल्हाळ सोडतो.

**राजा विक्रम** वैराग्याचा वेश घेऊन अनेक वेड्यांची स्थिती पाहत असतां, तो तेथील एका खोलींत गेला. तेथें एक अत्यंत सुंदर तरुण एका कोचावर बसून भगवत गीता वाचतांना त्यास आढळला. त्या तरुणानें आपल्या खोलींत दोन अत्यंत तेजस्वी बैरागी आलेले पाहून त्यांचे अतिशय अगत्स्वागत करून त्याच्याशीं तो मोठ्या

सभ्यतेनें भाषण करूं लागला. याचें वर्तन व भाषण ऐकून राजास मोठाच चमत्कार वाटला. ह्मणून तो वेशधारी राजा त्यास ह्मणाला, हे सुंदर तरुणा तुझ्या सारखा समंजस व ज्ञानी मनुष्य या वेड्यांमध्यें प्रतिबंधांत असलेला पाहून मला खरोखर मोठें आश्चर्य वाटलें! यास्तव तुझा सर्व इतिहास ऐकण्याची मला प्रबल जिज्ञासा झाली. ती माझी इच्छा पूरविण्याविषयीं मी तुझी विनंती करितो. असें त्या वेशधारी बैराग्याचें भाषण सुंदर तरुणानें ऐकून, आपलें गीतेचें पुस्तक बंद केलें. व तो त्यास ह्मणाला, माहाराज, मी ही गोष्ट कबूल करितों कीं, माझ्या हातून जे कित्येक प्रकार घडले आहेत, ते पाहून कांहीं लोकांस मला प्रथम येथें आणण्यास चांगली सवड सांपडली आहे; परंतु अझून येथें मला कां प्रतिबंधांत ठेवलें आहे, हें कांहीं मला आतां समजत नाहीं. व माझी जर सत्धर्मावर श्रद्धा नसती व हें गीतेचें पुस्तक मला प्राप्त झालें नसते, तर यापूर्वीं केव्हांच मी कायमचा वेडा झालों असतों. येथें मला शोधांतीं इतकें मात्र समजलें आहे कीं, महा प्रतापी व न्यायी **राजा विक्रम** याचा मुख्य प्रधान **चतुरसेन** याच्या हुकूमानें मला येथें ठेवल्यांत येत आहे. यास्तव हे साधु पुरुषांनो तुमच्या जवळ ईश्वरीज्ञाना संबधानें मात्र थोडें बहुत बोलावें असें माझ्या मनांत येतें. परंतु माझी कर्मकथा तुह्मांस सांगितल्यापासून कांहीं उपयोग व फायदा होईल असें मला वाटत नाहीं; ह्मणून तसें करण्याचें माझ्या मनांत येत नाहीं. याची मला क्षमा करा! माझ्या सुदैवानें **राजा विक्रमाची** कधीं इकडे फेरी होईल, तर त्यांस मात्र माझ्यावर अन्यायानें होत असलेल्या जुलमाची सर्व हकीकत निःसंशय सांगेन. व त्यांचें येणें या स्थलीं व्हावें, एतदर्थ मी नित्य परमेश्वराची प्रार्थना ही करीत असतो; परंतु अझुन तो मला प्रसन्न होत नाहीं,

त्या तरुणाचें हें भाषण ऐकून, तो वेशधारी राजा त्यास ह्मणाला, हे दुर्दैवी तरुणा, तुला हें माहित असेलच कीं, आमच्या सारख्या साधु पुरुषांस पुष्कळ स्वातंत्र्य असतें. आमच्या नजरेनें राजा व रंक हे दोघे सारखेच भासतात. यामुळें आह्मांस राजे, सरदार व श्रीमंत लोक यांच्या भेटी घेण्यास मुळींच प्रयास पडत नाहींत, व खराप्रकार त्यांच्या नजरेस आणून त्यांच्या नेत्रांत मणसणन अंजन घालण्याची

आह्मांस मुळींच भीति वाटत नाहीं. त्यांतून **राजा विक्रमा**सारख्याची भेट घेण्याचें तर बिलकूल कठीण नाहीं. यास्तव तुझी दुर्दैवाची काहाणी जर तूं मला सांगशील, व तुझें काम माझ्या हातून होण्यासारखें असल्यास तें मी केल्याशिवाय कधींही राहणार नाहीं, हें तूं पुरें लक्षांत ठेव! याप्रमाणें त्या वैराग्याचें भाषण ऐकून त्या तरुणानें थोडा वेळ विचार केला. नंतर एकवेळ उष्ण व दीर्घ श्वास सोडिला; कित्येक आश्रु गाळिले व आपला इतिहास सांगण्यास त्यानें आरंभ केला :—

तो तरुण ह्मणाला, माझें नांव **प्रेमसागर** माझा बाप या उज्जनी शहरांत प्रमुख व्यापारी आहे. त्याच्या प्रमाणें सधन व्यापारी या प्रांताच्या आसमंतांत भागीं पांचपन्नास कोसांत तर दुसरा नाहीं. त्यास मी एकुलता एकच पुत्र आहें. एके दिवशीं माझ्या बापानें मेजवानी केली. त्यासमयीं शहरांतील सर्व व्यापारी आपापले पु- बरोबर घेऊन जेवावयास आले होते. सर्वांचीं भोजनें आटोपल्यावर बोलतां बोलतां गोष्टी निघाल्या वरून, सर्वांनीं आपापल्या पुत्रांस कोणत्या प्रकारें उद्योग धंद्यास लाविलें हें सांगितलें. त्यांत कोणी आपल्या पुत्रास परदेशीं दुकान घालून दिलें; कोणी माल खरेदी करून देऊन, जलमार्गानें परदेशीं व्यापारास पाठविण्याची योजना केली आहे; कोणी आपण करीत असलेल्या व्यापाराशिवाय दुसऱ्या प्रकारचा व्यापार करण्या करितां शहरांतच परंतु निराळ्या मोहल्यांत आपल्या पुत्रास दुकान घालून दिलें आहे, असें सर्वांनीं निरनिराळ्या प्रकारें जी जी आपल्या पुत्रांची व्यवस्था केली होती ती ती सांगितली. याप्रमाणें माझे सर्व समवयस्क व्यापारी पुत्र व्यापारधंद्यांत निमग्न झाले आहेत असें मला समजलें व मी मात्र आजपर्यंत तसें कांहीं करण्याचा विचार केला नाहीं, ह्मणून मला फार वाईट वाटलें.

नंतर सर्वजण आपापल्या घरीं निघून गेल्यावर मी व माझा बाप असे दोघेच एकटे राहिलों. असें पाहून मी त्यास ह्मणालों, बाबा मी जरी या राजधानीच्या व्यापाऱ्यांच्या प्रमुखाचा पुत्र आहें, तरी मी मात्र अझून निरोद्योगी राहिलों आहें. हें माझें

भाषण ऐकून माझ्या बापाचे डोळे उघडल्याप्रमाणें झाले व त्यानें मला पाहिजे त्या मालाची वखार घालण्याची परवानगी दिली.

या परवानगी अन्वयें मी आपली इच्छा प्रदर्शित केल्याप्रमाणें माझ्या पित्यानें शहरांतील एका नाक्यावर जागा घेऊन, तेथें उंची जरी व रेशमी कापडाचा पुष्कळ माल भरून, गुमास्ते व चाकर नोकरांची सर्व उत्तम व्यवस्था केली, व तें दुकान माझ्या स्वाधीन केलें. माझ्या दुकानांत जसें उत्तम व मौल्यवान कापड असे, तसें शहरांत दुसरीकडे कोठेंच मिळत नसे. कारण, माझ्या पित्यानें आपल्या दिवाणास असा हुकूम फर्मावून ठेविला होता कीं, परदेशांतून जें उत्तम व अति मौल्यवान कापड येईल, तें सर्व माझ्याच वखारींत पाठवून द्यावें. यामुळें माझ्या दुकानांत श्रीमान व सरदार कुलांतील स्त्रीपुरुषांची निरंतर अतिशय गर्दी होऊं लागली. त्याकारणानें या राज्यांतील बहुतेक प्रमुख गृहस्थांची, बडे लोकांची व सरदारांची माझी चांगली ओळख झाली. व माझ्या हाताखालीं जरी अनेक गुमास्ते होते, तरी माझा सर्व वेळ कामकाजाच्या धांदलींत केव्हां व कसा निघून जाई हें मला समजतही नसे. व तसें राहण्याची मला आवड असल्यामुळें मी निरंतर मोठ्या आनंदांत असें. माझा पिताही माझी कामाची व्यवस्था पहाण्याकरितां वारंवार येत असे. व माझ्या दुकानांत सर्वदां श्रीमान स्त्रीपुरुषांची गर्दी पाहून त्यास फार समाधान होत असे.

एके दिवशीं मी आपल्या दुकानांतील खजिन्याच्या खोलींत बसलों असून, कित्येक गिऱ्हाइकांनीं वेष्टीत असतां, दोन तरुण व सुंदर स्त्रिया तेथें येऊन कोंचावर बसल्या. त्या दोन स्त्रियांत एक धनीण व दुसरी दासी होती. त्या स्त्रियांच्या अंगावर अत्यंत मौल्यवान अलंकार भूषणें होतीं. त्यांची इभ्रत पाहूनच माझ्या सभोंवती जीं दुसरीं गिऱ्हाइकें होतीं, तीं सन्मानपूर्वक मागें सरलीं. तेव्हां त्या दोन स्त्रियांत जी प्रमुख होती, तिनें आपल्या मुखावरील बुरखा जरा बाजूस करून आपले हरीण बालकाप्रमाणें चपल, पाणीदार व सुंदर नेत्र व मनोहर व अतुल सौंदर्याची थोडीशीं लकब मला दाखविली. त्या योगें लोहचुंबक जसा लोखंडाचें आकर्षण करितो, त्याप्रमाणें तिनें माझ्या मनाचें क्षणांत हरण केलें.

जोंजों सुखवासनेनें करूं जावा संग, तों तों व्याप वाढून संताप मात्र होतो, असें जें तुमच्या सारख्या साधु पुरुषांचें मत आहे तें सर्वांशीं खरें आहे. त्या सुंदरीस प्रथम पाहिल्या वेळेपासून माझ्या मनाची सर्वस्वी शांतता नष्ट झाली, मी अनेक प्रकारचीं दुःखें भोगिलीं, वेडा ह्मणून कारागृहवासांत सांपडलों गेलों. तथापि अझून त्या सुंदर मुखकमलाचा मला छंद मुळीच सुटत नाहीं. तिचे मनोहर नेत्रकमल, शशीमुख, आरक्त ओष्ठ, सरळ नाक, गुलाबी गाल, सिंहकटी व शुद्ध बांधा, अशी ती मनोहर मूर्ति माझ्या अंतःकरणांत चिरस्थायी झाली आहे. व तिच्या संगतीं अल्प काळच परंतु अवर्णनीय उपभोगलेल्या विषय सुखाची आठवण झाली ह्मणजे, मला जी अझून तळमळ लागून जाते, त्याची कल्पना महाराज आपल्या मनांत कशी भरवावी हें मला समजत नाहीं.

महाराज, आपण हें जाणतच असाल कीं, शारिरीक विकृती पेक्षां मानसिक विकृतीच्या वेदना दुःसह होत. मनुष्याच्या शरीरास झालेली जखम औषधोपचारानें लौकरच बरी होण्याचा संभव असतो. परंतु मनास जर जबर जखम झाली असेल, तर ती केव्हां बरी होईल याचें कोणी अनुमान करावें?—जेव्हां अंतःकरणाचा अति सकुमार अवश्य भाग कधींही बरा न होणाऱ्या व्याधीच्या गुप्त परंतु दुःसह वेदनेनें त्रस्त झाला असेल, तर त्यास औषधोपचार करणारा आजपर्यंत कोणी धनवंतरी निपजला आहे काय? अशा प्रकारें अंतःकरणास केव्हांही बरी न होण्यासारखी जखम करण्यास प्रेमाशिवाय इतर कोणीच समर्थ होत नाहीं:—हें प्रेम जरी अंध बालक आहे ह्मणून ह्मणतात, तरी त्याचें अचुक शरसंधानाचा प्रभाव एकवेळ मनुष्यांवर लागू पडला कीं, प्रेमाचें अंधत्वच या मनुष्याच्या दुःखास विशेष कारणीभूत होतें:—व हें बालक आपल्या अंधत्वाचा पुरा प्रभाव त्या मनुष्यावर लागू करितें:—या लहरी बालकाच्या दुर्धर मोहांत सांपडल्यामुळें मनुष्यास त्याच्या छंदानें वागल्यापासून अनिवार क्लेश भोगण्यांतच सुख आहे असें वाटतें: ज्या व्यक्तीकडे प्रेम त्या मनुष्याचें मन वेधतें, त्याच्या गुणावगुणांचा त्यास विचार न करूं देतां, तिचें दास्यत्व करण्यास लावितें. सारांश एक वेळ मनुष्य या अंध बालकाच्या अंकीत झाला असतां, त्याची

कर्तृत्व शक्ती, विचार शक्ती, ज्ञान, बुद्धि, सामर्थ्य आदि करून त्याच्या ठायीं असलेलीं मनुष्यपणाचीं सर्व चिन्हें हें एका निमिषांत नष्ट करून, त्यास अंध व सर्वस्वी पंगू बनवितें व आपल्या सूचनें-प्रमाणें त्या मनुष्यास वागवितें किंवा रडत बसण्यास लावितें. या पुष्प धनुर्धारी अंध बालकांचा मनुष्याच्या अंतःकरणांत शिरण्याचा मुख्यत्वें मार्ग ह्मटला ह्मणजे त्या मनुष्याचे नेत्र हेच होतः--व याचें मुख्य कारण ज्या व्यक्ती बद्दल हें प्रेमा उत्पन्न करितें त्याचें बहुधा सौंदर्यच होय.

सौंदर्य हें स्थीर नाहीं; परंतु हें महा पराक्रमी व बहुत बहुत मौल्यवान आहे. याची योग्यता मोठ्या महत्वाची नाहीं; तथापि याचा प्रभाव व सामर्थ्य अवर्णनीय आहे. हें आपणास कांहीं देत नाहीं, किंवा आपणापासून कांहीं घेत नाहीं; परंतु याच्या अवकृपेस आपण भितों; व याच्या प्रसन्न मुद्रेनें आपणास आनंद होतो. हें अज्ञानासही प्राप्त झालें असतां ज्ञानसंपन्नही याचे गुलाम होतात; हें अशक्ताजवळ असलें तरी शक्तीवान याचें आर्जव करितात. याचें सामर्थ्य लागूं पडूं द्यावयाचें नसल्यास, हें मनुष्यानें आपल्या नेत्रांत भरूं देऊं नये, हाच काय तो एक इलाज आहे. कारण सौंदर्य ही विलक्षण जादू होय.

त्या दोघींपैकीं प्रमुख सुंदरीनें क्षणेक माझ्या नेत्रांकडे पाहून स्मित हास्य करून, ती मला ह्मणाली **प्रेमसागरजी** आह्मांस कांहीं कापड घ्यावयाचें आहे, तरी तें लौकर आह्मांस दाखवा! तिला पाहिजे होतें तें मी कापड दाखविल्यानंतर, तिनें त्यापैकीं सुमारें पांच हजार मोहरांचें कापड पसंत करून, तें आपल्या चाकराचें स्वाधीन करून त्यास घेऊन जाण्यास सांगितलें. त्या सौद्यांत मला सुमारें ५०० मोहरांची प्राप्ती झाली. ह्मणून मी मोठ्या आनंदानें त्या मालाची किंमत घेण्याकरितां हात पुढें केला; तेव्हां ती मनोहर सुंदरी मला ह्मणाली, शेटजी तुह्मी कांहीं काळजी करूं नका! मी यावेळीं पैसे बरोबर आणिले नाहींत. आणखी थोड्या दिवसांनीं मला पुष्कळ माल खरेदी करण्यास यावयाचें आहे. त्यावेळीं तुमचे सर्व पैसे घेऊन येईन! तुमचे पैसे तुमच्याच पेटींत आहेत असे समजा! हें भाषण ऐकून तिची दासी ह्मणाली, बाईसाहेब हें काय आपलें

बोलणें ? हा नगरसेठाचा पुत्र **प्रेमसागर** तुह्मास हा थोडासा माल उधार देण्यास काकूं कसा करील.

अगोदरच मी तिच्या सौंदर्यानें व प्रेमकटाक्षानें गडबडून गेलों होतों.त्यांतून या दासीच्या भाषणानें तर या सुंदरीचें नांव व पत्ता विचारून घेण्याचें मला मुळींच भान राहिलें नाहीं. व मी मोठ्या प्रेमानें तिच्या मुखाकडे वेड्यासारखा पहात उभा राहिलों. तेव्हां तिनें जातां जातां पुनः एकवेळ माझ्या नजरेलानजर भिडवून गालांत हंसून ती पालखींत बसून निघून गेली. त्या समयीं देहांतून आत्मा निघून जावा तसें मला वाटून मी अति खिन्न मुद्रा धारण करून दारांत उभा राहिलों. ती निघून गेल्यावर बऱ्याच वेळानें मी शुद्धीवर आलों. व मला आठवण झाली कीं, जिला मी तो बहुमोल माल दिला, तिचें नांवही मी विचारून घेतलें नाहीं. हा विचार येतांच मला हळहळ लागून राहिली.कारण,माझ्या पित्यानें मला अनेक वेळा बजावून सांगितलें होतें कीं, या उज्जनी शहरांत पुष्कळ लबाड लोक आहेत; ते तुझ्या सारख्या व्यवहाराज्ञ मनुष्यास कोणत्यावेळीं कसें फसवितील याचा नियम नाहीं. यास्तव कोणास चांगल्या ओळखी शिवाय बिलकुल उधार माल देऊं नको ! ! त्याची मला आठवण होतांच मला या सुंदरीचें सर्व वर्त्तन संशयीत भासूं लागलें. तिचें प्रेमकटाक्ष व तिनें आपला बुरखा बाजूस करून मला जी मनोहर सौंदर्याची लबक दाखविली, त्यांतहीं तिचा कापण्याचा उद्देश होता, असें मला वाटूं लागलें. व माझ्या हातून झालेल्या चुकीमुळें बाप रागें भरेल ह्मणून मी अति खिन्न होऊन रात्रीं घरीं आलों.

मी आपल्या अविचारामुळें अति खिन्न होऊन बसलेला पाहून आईच्या तेव्हांच लक्षांत आलें कीं, कांहींतरी आज विशेष प्रकार घडला. व तिनें माझ्याकडून माझ्या दुःखाचें कारण विचारून घेऊन ती ह्मणाली,ज्या व्यापाऱ्यांस कधींच तोटा झालेला माहीत नाहीं, त्यास नफा करून घेण्याचें वर्म समजत नाहीं. याउपर जर तुला रागें भरणें होऊं लागलें, तर मी आपल्या जवळील द्रव्यानें तुझें नुकसान भरून काढण्यास तुला द्रव्य साह्य करीन. या प्रमाणें तिनें माझें समाधान करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. तथापि तिच्या

प्रयत्नाचा कांहींच उपयोग झाला नाहीं. दुसरे दिवशीं मी फसलों गेलों व पुष्कळ नुकसान झालें,ह्मणून अति उदास वृत्तीनेंच दुकानावर गेलें; तथापि ती सुंदरी लौकरच पुनः दुकानीं येईल, अशी मला थोडी बहुत अशा होती. यास्तव मी मोठ्या उत्कंठेनें तिची वेळो-वेळीं मार्ग प्रतिक्षा करीत असे. परंतु ती दोन तीन दिवस आली नाहीं; असें पाहून माझें औदासिन्य क्षणोक्षणीं विशेष वृद्धिंगत होऊं लागलें.

चौथे दिवशीं ती लावण्यमंजरी दासीसह पुनः माझ्या दुकानांत आली. व माझ्या समोर मोहरांची थैली ठेवून ह्मणाली, हे सुंदर तरुणा, ही आपली रक्कम बरोबर तपासून पाहून अहो घ्या!! अहो धरा व कांहीं कापड घ्यावयाचें आहे तें चांगलें दाखवा ! तिला व तिनें आणलेले पैसे पाहतांच मला नवीन जिवत्व प्राप्त झाल्याप्रमाणें हुशारी आली व आनंद झाला. त्या वेळीं तिला मी पाहिजे होतें तें कापड मोठ्या उत्साहानें दाखविलें. तिनें त्या समयींही कापड उधार नेलें;परंतु त्याचें मला फारसें वाईट वाटलें नाहीं. नंतर रात्रीं मी घरीं आल्यावर सर्व घडलेला प्रकार आईस सांगून पूर्वीं मी पराकाष्ठाचें दुःख दाखविलें होते खरें, परंतु त्यांपेक्षां आतां अतिशय आनंद प्रदर्शित करूं लागलों. तेव्हां ती मला पुनः ह्मणाली, बाळा, व्या-पारांत जो कोणी सहास करीत नाहीं, त्याचा कधींही, विशेष फायदा होत नाहीं, हे तूं निरंतर लक्षांत ठेव !

यानंतर हे महा पुरुषांनो त्या अनोळखी सुंदरीनें मागील बाकी आणून देऊन पूर्वीं पेक्षां अधिक किंमतीचा माल घेऊन जावयाचा असा क्रमच आरंभला. या मुळें थोड्या दिवसांतच तिच्याकडे माझी दहा हजार मोहरांची बाकी वाढली; परंतु तिनें आपलें नांव किंवा पत्ता मला मुळींच समजूं दिला नाहीं. व मलाही त्या विषयीं चौकशी करण्याचें भान राहत नसे.

एके दिवशीं प्रातःकालीं मी नुकतांच दुकान उघडून कोंचावर बसलों होतों; इतक्यांत एक ह्मातारी माझ्याकडे आली व मला ह्मणाली हे सुंदर तरुणा, मी तुझ्याकडे एका अति नाजूक व महत्वाच्या कामाकरितां मुद्दाम आलें आहे. ज्या तरुणीनें तुह्मांकडून थोड्या दिवसांपूर्वीं दहा हजार मोहरांचें उधार कापड नेलें, तिच्या

करून मी आलें आहे. मी तुह्मांस यावेळीं बाकी देण्यास आलें असें नाहीं,तर त्या सुंदरीनें प्रथम तुह्मांस असा निरोप सांगण्यास सुचविलें आहे कीं, या उपर तिला जो काय माल खरेदी करावयाचा असेल तो ती तुह्मा पासूनच घेत जाईल. दुसरा तिचा नाजूक व अतिमहत्वाचा असा निरोप आहे कीं, तिचें मन तुझ्यावर बसलें आहे. अर्थात तिचें लग्न अझून झालें नसून, ती सुंदर तरुण व एका अति धनाढ्य व संभावित गृहस्थाची कन्या आहे.तिचें, तुमचें थोडावेळ एकांतीं भाषण झाल्यावर जर तुमच्या मनांतून तिच्या बरोबर विवाह करण्याचें आल्यास, लागलेच तुमचा गुप्तरीतीनें विवाह करण्यांत येईल.व ती गोष्ट तुम्हास कबूल न होईल तर तुह्मी विनतक्रत परत या. परंतु नंतर घडलेल्या प्रकाराबद्दल तुह्मीं कोणाजवळ कांहीं बोलूं नये.या गोष्टी तुह्मास कबूल असल्यास प्रथम आतांच तुह्मांस तिचे भेटीस माझ्या बरोबर आलें पाहिजे !

या प्रमाणें ती म्हातारी भाषण करीत असतां, माझ्या अंतःकरणांत एकदम प्रेमाच्या ज्वाला भडकल्या व माझ्या सर्व शरीराच्या शिरांतील रक्त तापून जाऊन सर्व रोमांकुर उभे राहिले.त्या सुंदरीनें पहिल्याच प्रसंगीं मात्र माझ्या दुकानांत आल्यावर आपल्या तोंडावरून बुरखा काढून, आपल्या मनोहर प्रेम कटाक्षाचा व सौंदर्याच्या लवकीचा प्रभाव जो काय एक वेळ दाखविला होता तेवढाच. त्यानंतर ती जरी अनेक वेळ माझ्या दुकानांत आली होती,तरी तिनें कधींही आपल्या तोंडा वरील बुरखा काढला नव्हता, तथापि तिच्या पहिल्याच भेटींत तिचे मारू नेत्र व चेहरा यांच्या सौंदर्याचा पूर्ण ठसा माझ्या अंतःकरणावर उमटल्यामुळें त्या सभोंवतीं तें निरंतर घिरट्या घालीत,होतें.शिवाय तिच्या शरिराची रेखलेली ठेवण,गतीची छब,नाजूक व सुंदर हातपाय वगैरे जो साहाजिक तिच्या शरीराचा भाग दृष्टीस पडे तो पाहून व तिचा कोकिलेप्रमाणें मधुर ध्वनी ऐकून मी तिला माल दाखवूं लागलों असतां माझी लटपट उडून जाऊन सावधानता नष्ट होऊन तिला मालाची किंमत मागण्याचें किंवा तिचें नांव व पत्ता विचारून घेण्याचें मला मुळींच स्मरण रहात नसे. इतकेंच नव्हे पण ती नेहमीं माझ्या माला शिवाय माझें मन ती आपल्या बरोबर घेऊन जाई.

जी सुंदरी प्राप्त व्हावयासारखी नसते, तिच्या सौंदर्यास जरी मनुष्य लुब्ध झाला असला तरी विवेकानें तो मनाचें आकलन करूं शकतो; परंतु जी वश होण्याचा संभव दिसतो, तिच्या प्रेम संबंधाच्या विचारापासून मनाचें आकलन करणें अति बिकट काम होय. त्यांतून ज्या सुंदरी संबंधाचे विचार वारंवार माझ्या मनांत घोळत होते, ती माझ्यावर अति प्रेम करते, असें जेव्हां ह्मातारीनें मला सांगितलें,तेव्हां माझ्या अंतःकरणाची जी अवर्णीय स्थिती झाली होती त्यांत आश्चर्य करण्या सारखें तें काय? माझें अंतःकरण फडफड उडुं लागलें; माझ्या सर्व शरिरास कंप सुटला व मला वाटलें कीं,आतां स्वर्गसुखाप्रमाणें सुख प्राप्त होण्याचा समय आला तो व्यर्थ घालवूं. नये ह्मणून लगेच त्या ह्मातारी बरोबर जाण्याची मी तयारी केली. व दुकान बंद करून आईस असा निरोप पाठविला कीं, मी आपल्या मित्रांसह शहरांबाहेरील बागेंत जेवावयास गेलों.

याप्रमाणें घरीं निरोप पाठवून मी त्या ह्मातारी बरोबर निघालो. तिनें प्रथम मला एका देवालयांत नेलें. तेथें गेल्यावर ती मला असें ह्मणाली कीं,तुह्मांस जी गोष्ट सांगितली ती मान्य न झाल्यास ज्या स्थलीं तुह्मास मी नेणार तें तुमच्या लक्षांत राहूं नयें एतदर्थ मी तुमचें डोळें बांधून तेथें नेणार ! त्या समयीं त्या ह्मातारीनें मला एखाद्या आडांत उडीं टाकली असतां ती सुंदरी भेटेल, असें सांगितलें असतें,तरी मी तसें केलें असतें; तेव्हां अर्थात माझ्या नेत्रांवर पटल बांधण्याच्या तिच्या विचारास मी बिलकूल आढेवेढे घेतले नाहींत. तिनें माझे डोळे बांधल्यावर मला त्या देवालया सभोंवती तीन प्रदक्षणा घालण्यास लावलें. नतर तिनें माझा हात धरून ती घेऊन चालली. सुमारें घटकाभर आह्मीं चालल्यावर तिनें मला एका बागेंतील शोभिवंत व भव्य वाड्यांत नवूने व एका सुंदर कोचावर बसवून, नंतर माझ्या डोळ्यावरील बांधलेला पडदा सोडिला.इतक्यात अति मौल्यवान पोषाक परिधानकेलेल्या दोन दासी तेथें होत्या;त्या माझ्याजवळ आल्या.व त्या मला ह्मणाल्या,महाराज आपण आंतील दिवानखान्यांत चलावें, हें स्थल आपणास बसण्यास लायक नाहीं. वास्तविक पाहातां तेथें कोणत्याही ऐषआरामाच्या पदार्थाची किंवा शोभेची नून्यता आहे

असें मला तर मुळींच वाटलें नाहीं. परंतु परस्थलीं किंवा दुसऱ्याच्या घरीं मनुष्य गेला असतां वेड्यासारखी त्याची स्थिती होते. त्यास तेथील मनुष्यें सांगतील तसें वागावें लागतें. त्याप्रमाणें त्यांचें भाषण ऐकून मी निमुटपणें तेथून उठलों व त्यांच्या मागून जाऊं लागलों. ती म्हातारीही आह्मां बरोबर येतच होती. आह्मीं तीन दरवाजे ओलांडून चौथ्यांत पाऊल ठेवतांच त्या दिवान-खाण्यांत असलेल्या दहा सुंदर दासी मला सामोऱ्या आल्या व माझ्या बरोबर येथपर्यंत आलेल्या दोन दासी तेथेंच थबकल्या. नंतर त्या दहा दासींच्या बरोबर मी आणखी दोन सुंदर दिवान-खान्यांतून पुढें गेलों. तिसऱ्या दिवानखान्यांत जातांच तेथील वीस दासी पुढें येऊन त्यांनीं मला मोठ्या आदरसत्कारानें एका हस्तीदंती व किनकाफाच्या गादीच्या कोंचावर बसविलें. नंतर तेथून माझ्या बरोबर इतका वेळ आलेली म्हातारी मला तेथें न बसण्याविषयीं सांगून ती अंतरगृहांत गेली.

त्या वाड्यांत पाऊल ठेवल्यापासून मला तेथें असा चमत्कार आढळला कीं, जों जों मी आंत जाऊं लागलों तों तों तेथील ऐश्वर्य व शोभाही वाढत्या प्रमाणांत असून अधिकाधिक तरुण व सुंदर दासी भेटूं लागल्या होत्या माझ्या पित्याजवळही अफाट संपत्ती होती; व अनेक सुंदर व मोल्यवान वस्तु माझ्या अवलोक-नांत आल्या होत्या; परंतु त्यांचा काय उपयोग व तो कसा करावा? हें मला मुळींच माहित नव्हतें. किंमत आली ह्मणजे त्या वस्तु विकून टाकाव्यात इतकेंच मी जाणत होतों. तेथें अनेक शोभिवंत व मोल्यवान वस्तु व्यवस्थेशीर टेविल्यामुळें तें स्थल केवळ इंद्रभुव-नच आहेसें मला भासलें व तेथील अनेक चित्रविचित्र देखावे पाहून मी अगदीं थक्क होऊन भांबावून जाऊन दशदिशेकडे नजर फिरवून पहात असें.

थोड्या वेळानें ती म्हातारी परत आली व तिच्या बरोबरच्या एका सुंदर दासीनें सुवर्णाच्या ताटांत मेवामिठायी, कांहीं मधूर फलें व एक पाण्याची झारी माझ्याकरितां आणिली होती. त्या तरुणीचें सौंदर्य व चकमणें, ठमकणें, पाहून मला वाटलें कीं, हीच ती माझी मनोहारिणी असावी, ह्मणून मी तिच्याशीं कांहीं बोलण्याच्याही रंगांत होतों; इतक्यांत ती म्हातारी ह्मणाली, महाराज माझी धनीण

अझून आली नाहीं. यास्तव आपण उतावीळ होऊं नका ! आपण जरा उपहार करा! नंतर थोड्या वेळानें बाईसाहेब येऊन आपणास भेटतील, व जें काय बोलावयाचें आहे तें बोलतील. त्या प्रमाणें ती म्हातारी माझ्याशीं बोलत असतां ती सुंदर दासी माझ्या समोर तें सुवर्णाचें ताट व पाण्याची झारी ठेवून निघून गेली. नंतर दुसऱ्या कित्येक सुंदरी ताल सुरावर नृत्य करून मधूर गायन करूं लागल्या.

त्या वृद्धेच्या आग्राहा वरून मी थोडा उपहार करीत असतां सुस्वर नृत्यगायन चाललें आहे. शिवाय कांहीं दुसऱ्या सुंदरी माझ्याजवळ अत्यंत दक्षतेनें व आदबीनें उभ्या राहून, माझें चलन वलन किंवा मुद्रा पाहून माझ्या मनांत कोणती इच्छा आली, ती केवळ तर्कानें जाणून ती पुरविण्याकरितां मोठ्या तत्परतेनें सिद्ध आहेत. तसेच त्या स्थलाची अद्वितय शोभा व तेथील ऐश्वर्य पाहून मी स्वर्गीं किंवा मृत्युलोकीं आहे? याची मला शंका वाटूं लागली.

माझा उपहार झाल्यावर अनेक दासी येऊन त्यांनीं माझ्या शरीरास सुगंधीं द्रव्यें मर्दन करून मला मंगल स्नान घातलें. व उत्तम वस्त्रें परिधान करण्यास देऊन पूर्वीं पेक्षां अंतरंगांतील विशेष शोभिवंत व विस्तीर्ण अशा दिवानखान्यांत नेऊन मला एका कोंचावर बसविलें. इतक्यांत सायंकाळचा समय झाला. त्या समयीं तेथील एक दरवाजा उघडून माझी मनोहरिणी बाला समवयस्क अत्यंत सौंदर्यसंपन्न वीस दासींच्या समुहासह येतांना मला आढळली. ती तारांगणांत जसा चंद्र शोभतो, तशी आपल्या दासी मंडळांत तेजस्वी दिसत होती. ती विदुल्लते प्रमाणें चमकत माझ्या कडे येतांना पाहून माझे नेत्र दिपून गेले, व क्षणेक माझी सावधानही नष्ट झाली; परंतु तिची, माझी दृष्टादृष्ट होतांच प्रेमानें मोठ्या आवेशानें माझ्या अंतःकरणावर प्रहार केला. त्या बरोबर मी गजबजून जागा झाल्याप्रमाणें मला वाटलें. व त्या मनोहर सुंदरीकडे पहाण्यानें मला अत्यानंद होऊं लागला व तेव्हां पासून कांहीं केल्या माझ्या अंतःकरणांतुन तिच्याविषयीं प्रेम कमी होत नाहीं. त्या अव बालकांन आपलें कायमचें ठाणें माझ्या अंतर्यामी देऊन माझी नानाप्रकारें विटंबना करूनही मला दुःसह यातना देत आहे.

महाराज ईश्वरी योजनेनें कोणास कोणत्या प्रकारच्या मनुष्यांशीं केव्हां गांठ पडेल, व त्यांच्या संगतीपासून परस्परांस सुख किंवा दुःख होईल, याचा कांहीं नियम कोणासही सांगता येणार नाहीं. कुलीन, सुज्ञ व संभावित मातापितरांच्या पोटीं जन्म होणें, सद्गुणी स्त्री प्राप्त होऊन, तिनें निरंतर आपल्या मर्जीप्रमाणें वागणें, व गुणसंपन्न व आज्ञाधारक संतती होणें, वगैरे प्रकारच्या संगती प्राप्त होण्यास निःसंशय दैवाचीच अनुकूळता लागते, या गोष्टी बहुतेक लोक कबूल करतात. तसेंच बाल्यदशेपासून तारुण्य प्राप्त झाल्यानंतरही अंतकाळपर्यंत चांगल्या किंवा वाईट मनुष्यांशीं मित्रत्व जडणें किंवा ओळख होणें, अगर एखादा प्रामाणिक किंवा लबाड चाकर मिळणें, इत्यादि संबंधांत सुद्धां ईश्वरी योगायोग असतो, असें कित्येक प्रसंगीं ह्मणणें भाग पडतें. सारांश, व्यवहाराचें सूक्ष्म रीतीनें अवलोकन केलें असतां, अनेक वेळ असें स्पष्ट दिसून येतें कीं, प्रयत्नाशिवाय प्रारब्ध हें पंगू आहे असें ह्मणतात तें खरें, तसेंच प्रारब्धाच्या चलतीशिवाय प्रयत्न पंगू असें ह्मणण्यास कोणताच बाध नाहीं. कारण, मनुष्याच्या आयुष्यक्रमांत कोणत्या मनुष्याशीं केव्हां गांठ पडेल, व त्याच्या संगतीपासून त्याच्या मनास कसा भ्रंश पडेल किंवा तें सुधारेल, व वर्त्तनांत चलबिचल होऊन आयुष्य सुखांत किंवा दुःखांत जाईल याविषयीं कोणी भविष्य कथन करावें ?

ती लावण्यसंपन्न बाला मी बसलेल्या दिवाणखान्यांत नखऱ्यानें चमकत ठमकत येऊन, माझ्या समोरच एक सुंदर कोंच होती तीवर बसली. व तिच्यासह आलेल्या दासी मोठ्या अदबीनें तिच्या आजुबाजूस उभ्या राहिल्या. इतक्यांत ती ह्मातारी तेथें आली व मला ह्मणाली, महाराज बाईसाहेबांचा व तुमचा विवाह होण्यापूर्वीं तुमचे एकमेकांचे विचार व मनोदय परस्परांस समजले पाहिजेत; परंतु स्त्रियांच्याठायीं असणाऱ्या स्वाभाविक मर्यादेमुळें. आमच्या बाईसाहेबांची कौमार्य आवस्था व त्यास आजपर्यंत आपल्या पित्याशिवाय इतर पुरुषांशीं बहुधा कधींही बोलण्याचा प्रसंग नसल्यामुळें, त्यांस जें तुह्मांस मागावयाचें आहे, तें त्यांच्या तर्फेनें मी तुह्मांस सांगतें. त्या संबंधानें तुमच्या मनांत जे विचार

येतील, ते निष्कपटभावानें तुह्मीं लगेच स्पष्ट बोलून दाखवावे. याप्रमाणें तुमचे एकमेकांचे विचार परस्परांस मान्य झाल्यास आजच दोन घटका रात्रींनंतर लग्नाचा सुमुहूर्त आहे; त्या मुहूर्तावर तुमचें उभयतांचें लग्न लागेल. इतका उपोद्घात करून ती झातारी ह्मणाली:—

"आमच्या बाईसाहेबांनीं तुह्मांस एकेदिवशीं रस्त्यांत पाहिलें. व स्त्रियांचें अंतःकरण अत्यंत कोमल व बाह्य सौंदर्यास साहजिक लुब्ध होण्यासारखें ग्राहक असल्याकारणानें त्या तुह्मांस तेव्हांच अतिशय मोहीत झाल्या; परंतु तुमच्याविषयीं चांगली माहिती करून घेतल्याशिवाय पुढें पाऊल टाकणें व ढकलूं देणें वाजवी नाहीं. जाणून ह्या तुमच्या दुकानीं कापड विकत घेण्याच्या निमित्यानें जाऊं येऊं लागल्या होत्या. नंतर तुमचा सरळ व प्रामाणिक स्वभाव ओळखून तुह्मी जर त्यांच्या सुचनेप्रमाणें वागण्यास सिद्ध व्हाल, तर तु मच्याशीं विवाह करण्याचा त्यांचा विचार ठरला आहे. ह्या सूचना ह्याच होत कीं, तुमचा व बाईसाहेबांचा एकवेळ विवाह झाला असतां तुमचें सर्व स्वातंत्र्य नष्ट होईल! तुह्मांस निरंतर या महालांतच राहावें लागेल.! वर्षांतून एकवेळ मात्र तुमच्या मातापितरांस भेटण्या करितां ह्मणून तुह्मांस बाहेर जाण्यास मिळेल! दुसरें, तुमचा दो घांचा जो विवाह होणार तो तूर्त बाईसाहेबांच्या आईबापांच्या सल्ला मसलतीशिवाय गुप्तरीतीनें होणार! कांहीं काळपर्यंत हें तुमचें प्रेमरसा चें लग्न त्यांस कळूं द्यावयाचें नाहीं! त्यांस हें लग्न कळविण्याची वेळ येईपर्यंत तुमचा कोणा बरोबर किंवा कोणाच्या सुंदर कन्येबरोबर प्रीति विवाह लागला, हें सुद्धां समजूं द्यावयाचें नाहीं. यास्तव तुह्मी यांचें नांववगैरे विचारून घेऊन चौकशी करण्याचा प्रयत्न ये थील दासीजवळ अगदीं करूं नये! तिसरें, तुमचें लग्न बाईसाहेबांच्या बरोबर झाल्यानंतर अर्थात तेथील सर्व दासींसही सर्वदां तुमच्या आज्ञेंत वागावें लागेल, तरी त्यांच्याशीं तुह्मी कधीही रंगानें थट्टा मस्करीचा अधिक प्रसंग करूं नये!! तुह्मांस त्यांच्या जवळून काय काम करून घेण्याचें कारण पडेल, तितक्या पुरतेच त्यांच्या शीं बोलत जावें! याप्रमाणें वागण्याचें तुह्मीं कबूल करीत अ सल्यास आह्मीं आजचा मुहूर्त साधण्याच्या तयारीस लागतों नाहींतर ह्या घ्या तुमच्या मोहरा! (असें ह्मणून तिनें दासीकडून



मोहरांची थैली आणविली होती तीकडे बोट दाखविलें.) आणि ज्याप्रमाणें तुह्मांस मी येथें प्रथम आणिलें होतें, त्याप्रमाणें डोळे बांधून नेऊन पोंहचतें करतें!" याप्रमाणें बोलून झाल्यावर मी काय उत्तर देतों तें ऐकण्या करितां ती झातारी मुकी राहिली.

त्या समयीं मी उत्तर दिलें कीं बाई तूं सांगितल्याप्रमाणें वागण्यास माझी बिलकूल हरकत नाहीं. माझें स्वातंत्र्यच काय? तुझ्या धनीणीवर माझें इतकें प्रेम जडलें आहे कीं, तिच्याकरितां माझा देहांत होण्याचा प्रसंग आला, तरी मी त्याची परवा करणार नाहीं! आणि माझें जर तिच्यावर खरें प्रेम जडलें आहे, तर तिच्या संगतीं मला जितकें अधिक वेळ राहण्यास सांपडेल, तितका मला अधिक आनंद व सुख होईल. यास्तव तुझ्या मालकिणीची प्राप्ती होऊन माझें स्वातंत्र्य जरी नष्ट झालें तरी मला विषेश सुखच होईल, असा माझा पूर्ण समज झाला आहे. तसेंच तिचें जर मनसोक्त संगतीसुख मला प्राप्त होत आहे, तर तिचें कोरडें व तिच्या पित्याचें निष्कारण नांव वगैरेची चौकशी करून मला काय कर्तव्य आहे? आतां तुझ्या तिसऱ्या सूचनेंत तर मला कांहींच अर्थ दिसत नाही! कारण, माझें अनन्यभावें तुझ्या मालकिणीवर प्रेम आहे तर तिच्या दासींची थट्टामस्करी करण्याचे कधींही माझ्या मनांत यावयाचें नाहीं. राजहंसाची आदरपूर्वक संगती मोडून काकाच्या संगतीची इच्छा करण्या इतका मी वेडा नाहीं, हें तूं पुरें लक्षांत ठेव!

याप्रमाणें त्या झातारीचा व माझा संवाद संपेपर्यंत माझी मनोहरिणी सुंदरी सलज्जतेनें खालीं मान घालून, आमचें बोलणें लक्षपूर्वक ऐकत होती. माझें भाषण संपतांच तिनें स्मित् हास्य करून प्रेमकक्षाटानें माझ्याकडे एकवेळ पाहिलें. नंतर आपल्या कित्येक दासींस खुणाविलें. त्याबरोबर त्यांनीं लगबग जाऊन पड्स अन्नांनीं व नानाप्रकारच्या पक्वानांनीं सिद्ध केलेलीं, अशीं दोन सुवर्णाचीं ताटें आणिलीं. त्यावेळीं आह्मीं दोघेंही शेजारीं शेजारीं जेवण्यास बसलों. आमचें भोजन होत असतां आमची एकमेकांची गोडी चेपावी, एतदर्थ आह्मीं एकमेकांस कित्येक पदार्थ घेण्याविषयीं आग्रह करीत असून, मधून मधून आमच्या भावी संबंधाच्या कित्येक विषयांवर प्रेमरसानें ओतप्रोत भरलेल्या अशा रंगानें गोष्टी

चालल्या होत्या. याप्रमाणें थाटानें आमचे दोघांचे भोजन झाल्या-
वर माझें अंतःकरण बलात्कारानें चोरणाऱ्या त्या सुंदरीच्या आज्ञे-
वरून आमच्या विवाहाची सिद्धता करण्याकरितां अनेक दासी
लागल्या. व आह्मी प्रीति या रसाळ विषयाबद्दल आमचे एकमेकांचे
विचार आह्मीं परस्परांस आनंदानें सांगत होतों.

त्यासमयीं प्रीति या विषयसंबंधानें माझें असें मत होतें कीं
प्रीति ही मनुष्याच्या आयुष्याचें रहस्य व मुळतत्त्व असून, त्याच्या
सुखाचें व आनंदाचें मुख्य बीज व त्याच्या सर्व सद्गुणांत प्राधान्य
आहे. याप्रकारच्या त्या वेळच्या व आतांच्या माझ्या विचारांत
महदंतर पडलें आहे. असो; वर दर्शित केल्याप्रमाणें माझें प्रेमळ विचा
मी त्या सुंदरीस प्रगट केले. त्याचप्रमाणें तिचेंही जे विचार हो
ते तिनें मला सांगितले. आमचे एकमेकांचे विचार परस्परां
आवडल्याकारणानें तिनें खुलून माझ्या विचाराची व शहाणपणाची
मोठी तारीफ केली व मी तिची केली. कारण, त्यावेळीं आह्मी
एकमेकांच्या प्रीतीच्या मद्याच्या मोहांत इतके कांहीं विलक्षण
प्रकारें गुंग झालों होतों कीं, परस्परांस आवडण्यासारखें भाषण
व वर्तन करण्यांतच आमच्या जन्माचें सार्थक्य आहे; बाकी स
जग शुन्याकार व विरस आहे असें वाटत होतें. परंतु कालांतरा
सर्व विचारांत फरक पडतो. प्रथम दर्शनीं मनुष्यास जी आमृतवल्ली
वाटत असते, तीच नंतर सर्व भक्षक काल वीषवल्ली करून दाखविते.
या सर्व भक्षक राक्षसाचें असें विलक्षण सामर्थ्य आहे कीं,
वस्तु त्याच्या झपाट्यांत सांपडते, ती कितीही उत्तम, तेजस्वी
सुंदर असो, अल्पावकाशांत तिचा चांगुलपणा जातो, सौंदर्य न
होतें व ती तेजहीन बनते. याप्रमाणेंच माझ्याही प्रीतीच्या रसरसी
विचाराची अवस्था झाली. पूर्वी माझे प्रीतिसंबंधानें जे विचार हो
त्याच्या अगदीं विरुद्ध आतां मत झालें आहे. आतां प्रीती ही स
प्रकारच्या दुःखाचें व काळजीचें माहेर वर आहे—ही मुळेंच म
याचे सर्व दिवस काळजींत निमग्न राहण्यांत व रात्री निद्रारहि



आतां मला वाटूं लागलें आहे. परंतु अझुन त्या प्रीतिच्या जादूच्या
मोहपाशांतून मुक्त होत नाहीं. अशी विलक्षण जादू आहे.

त्यावेळीं या लाघवी, मोहक जादूच्या किंवा प्रीतीच्या मद्याच्या
चांगुलपणाबद्दल जितकें बोलावें तितकें थोडेंच असें आह्मांस वाटत
असल्याकारणानें त्याप्रकारच्या भाषणांत आमचा किती वेळ गेला,
हें आह्मांस बिलकूल समजलें नाहीं. आमचें भाषण मोठ्या आनंदानें
व रंगानें चाललें असतांच, दासींनीं विवाहाची सर्व सिद्धता झाली व
मुहूर्तघटीही समीप आली आहे असें सांगितलें, तेव्हां ती सुंदरी उठून
अंतरगृहांत गेली. नंतर थोड्यावेळानें मलाही एक दासी बोलवा-
यास आली. तिनें मला दुसऱ्या एका सुंदर दिवानखान्यांत नेलें. तेथें
आमच्या विवाहाची सर्व सिद्धता करून ठेविली असून, तो विधी
यथासांग करण्यास्तव दोन ब्राह्मणही आले होते. त्यांनीं खिमा
रम करून मंत्रोक्त आमचा विवाह लावून देऊन ते निघून गेले.

मंत्राचे सर्व विधि आटोपून ते ब्राह्मण निघून गेले, त्या वेळीं
सुमारें प्रहर रात्र होण्याचा समय आल्याकारणानें पुढील रंगेल तंत्रांस
आरंभ करण्याची तयारी झाली. ती रात्र वैशाखमासाची उष्ण-
काळाची असून, स्वच्छ चांदणें पडलें होतें. यास्तव पुढील सर्व नाजूक
तंत्रें महालासभोवतील मनोहर बागेंत करण्याचें सर्वानुमतें ठरलें.
प्रथम आह्मीं दोघे एका पुष्पवटिकेंत एके पात्रांत बसून मोठ्या प्रेमानें
एकमेकांच्या तोंडांत प्रेमानें घांस भरून हंसून खेळून मोठ्या आनंदानें
भोजन केलें. नंतर दुसऱ्या एका सुगंधी पुष्पवटिकेंत पुष्पशय्या तयार
करून एक मंचक मांडिला होता, त्यावर बसून तांबूल भक्षण कर-
ण्यास एकमेकांचा हात धरून आह्मी दोघे तेथें गेलों. त्या मंचकावरील
पुष्पशय्येवर जाऊन आह्मी दोघेहीं बसल्यावर त्या मनोहर लाव-
ण्यसुंदरीनें त्या मंचकाशेजारील चौरंगावरील एका तांबूलपात्रांत
त्रयोदशगुणी गोविंदविडे करून ठेविले होते, त्यांपैकीं एक सुवर्णवर्खी
विडा मोठ्याप्रेमानें व हास्य मुखानें तिने कोमल हस्तांत घेऊन माझ्या
अंकावर बसून डावा हात माझ्या कंठांत घालून उजव्या हातानें
तो विडा माझ्या मुखांत घातला. नंतर अनेक प्रकारचीं सुगंधीक तेलें

माझ्या मुखाकडे आपल्या नेत्रांची पापणी बिल्कूल हालूं न देतां प[...] उत्कंठेनें पाहूं लागली. त्यासमयीं मीही आपला उजवा हात तिच[...] गळ्यांत घालून, तिच्या निष्कलंक मुखचंद्राकडे प्रेमभरानें पाहत रा[...] आमची दोघांची नजर अगदीं एक करून डावा हात तिच्या हानव[...] खालीं घालून, तिचें मुखकमल जरा वर उचलून, दोन तीन वेळ मी [...] चीं अत्यंत प्रेमानें चुंबनें घेतलीं. नंतर माझ्या मुखांत घातलेलें तां[...] अर्धवट चरवण झालें असें पाहून, त्यांतील अर्धा भाग मी आपल्य[...] जिव्हाग्रीं घेऊन तिच्या मुखांत तोंडभर तो विडा घातला. त्यासमय[...] आह्मीं दोघेही मदनव्यथेनें बेशुद्ध होऊन त्या पुष्पशय्येवर पडल[...]

याप्रमाणें विषयरंगाच्या व प्रेमाच्या प्रथम लहरीच्या रसाळ अ[...] नंदांत व सुखांत आमचे १५ । २० दिवस कसे व केव्हां नि[...] गेले हें आह्मांस समजलें सुद्धां नाहीं. परंतु नंतर हळूहळू वहिवाटीनुस[...] आमच्या रंगींरंग करण्याच्या क्रमाचा बेरंग होण्यास आरंभ झाल[...] मनुष्याचा एक सारखा पुष्कळ काल सुखांत व आनंदांत जा[...] अशक्य होय. त्यांतून सुख व आनंद करण्याचा पूर्वीं विचार कर[...] तसे प्रयत्न साध्य होणें, अतिच विकट काम आहे. मनुष्यास सु[...] व आनंद जे होत असतात, तें आकस्मित कारणपरत्वें होत असता[...] विचार, मनन किंवा प्रयत्न यायोगें या गोष्टी साध्य करावयाच[...] नव्हत. तसेंच मनुष्याचें मन बलात्कारानें ज्या गोष्टीं कडे वळ[...] ण्यास झटावें तसें न वळतां लगेच पूर्व स्थितीवर येतें; किंवा प्रसंगोप[...] विरुद्ध दिशेकडे सुद्धां वळतें. सारांश, ती अतुल लावण्यमंज[...] माझ्या आधीन होण्यापूर्वी तिच्या नाजूक संघट्टणानें मला स्वर्गसुख[...] पेक्षां अधिक सुख व आनंद होईल अशी जी सणस[...] कल्पना माझ्या मनांत येत होती, ती केवळ स्वप्नवत होय, [...] लौकरच माझ्या अनुभवास आलें.

त्या अतुल सकुमार सुंदरीच्या संगती सुखांत १५ । २० दि[...] लोटल्यानंतर मला माझ्या प्रेमळ मातापितरांची वारंवार आठ[...] होऊं लागली. मी आकस्मित नाहींसा झाल्याकारणानें तें अ[...] शय काळजींत निमग्न होऊन जातील या कल्पनेनें मला वरं[...] पराकाष्ठेचें दुःख होई. व मी मुळींच उद्योगधंदा सोडून स्त्रैण ब[...] निरंतर विषयसुखांत लंपट होऊन राहणारा हटल वचन बद्ध झाल[...]

विषयींही मला अत्यंत वाईट वाटूं लागलें. याप्रमाणें माझें म- फिरण्याचें कारण त्या सुंदरीवरील माझें प्रेम अंशतःही कमी झालें होतें असें नाहीं. तिच्या संगती पुष्कळ वेळ राहवें असें जरी मला निरंतर वाटत होतें, तरी आमच्या वर्तनक्रमांत मुळींच वैचित्र्य नसून, सर्वदां त्या बंदिखान्यांत राहवें लागत असल्याकारणानें माझ्या प्राणसखीजवळ सर्वकाळ हंसून, खेळून, गुंगून तिची मर्जी प्रसन्न करण्याच्या प्रयत्नांत निरंतर राहणें मला दुर्गम झालें. यास्तव मला औदासिन्यता प्राप्त झाली.

याचप्रमाणें परंतु निराळ्याकारणांनीं माझ्या वल्लभेच्याही मनाची आवस्था झाली होती. महाराज राजे, सरदार वगैरेच्या व व्यापाऱ्यांच्या वर्तनक्रमांत पुष्कळ गोष्टींचें अंतर असतें. या दोन प्रकारच्या स्थितींतील लोकांपैकीं एक ज्या गोष्टींस गुण असें समजतात, तेच दुसऱ्यास दुर्गुण असे वाटतात. व माझी जिवलगाही कोणत्यातरी सरदार कुळांतील असावी अशी लौकरच माझी खात्री झाली होती. तेव्हां आमचें दोघांचें बाळपणापासून शिक्षण निराळ्या प्रकारचें होतें, हें उघडच झालें. यामुळें तिच्या चालचलणुकींत व वर्तनांत अशा क्षुल्लक परंतु अनेक अशा गोष्टी होत्या कीं, त्या मला अगदीं आवडत नसत व माझ्या तिला आवडत नसत. ज्या समजाच्या किंवा प्रकृतीचा मनुष्य असेल, त्याप्रमाणें प्रत्येक वस्तूचें चांगलें किंवा वाईट असें स्वरूप त्यास बदलून करून दाखविता येतें. या जनसमूहाच्या मनाच्या कलाविषयीं एका चितार्‍याची गोष्ट माझ्या ऐकण्यांत आहे.

एका प्रसिद्ध चितार्‍यानें एक उत्तम चित्र काढलें; व याची दुसरी एक नक्कल अगदीं हुबेहूब केली. नंतर त्यापैकीं एक चित्र चोहोंव्याच्या स्थलीं चिकटाविलें, व त्या खालीं असा शेरा लिहून ठेविला कीं, या चित्रांत ज्या कोणास कांहीं व्यंग दिसेल, त्यानें त्या चित्राच्या भागावर खूण करून ठेवावी. नंतर दुसरे दिवशीं मोठ्या ऐटीनें तो चितारी आपलें चित्र पहाण्यास गेला, तेव्हां त्यास आढळून आलें कीं, आपलें सर्व चित्र व्यंगानें भरलें आहे. तिसरे दिवशीं त्या चित्राची दुसरी नक्कल त्याच ठिकाणीं त्यानें लाविली. व त्याच्या खालीं असें लिहिलें होतें कीं. या चित्राचा जो उत्तम भाग अ:

न्दत, त्यावर मात्र खूण करावी! तेव्हां एका प्रेक्षकास एक भाग उत्तम वाटला, दुसऱ्यास दुसरा वाटला, याप्रमाणें शेवटीं तें सर्व चित्रच उत्तम ठरलें.

याप्रमाणें जगांत एकंदर व्यवहार आढळून येतो. जी वस्तु एकास अति प्रिय वाटते, तिचाच दुसरा अत्यंत द्वेष व तिरस्कार करितो. त्यांतून सुखावस्थेंत व भाग्योदय कालीं सकुमार सुंदरीच्याठायीं अवर्णनीय लहर दिसून येते. प्रत्येक गोष्टींत तिचा लाडका व्यवहार व तबियत असते. ती क्षणोक्षणीं अनेक दुःखाचीं व खेदाचीं कारणें कल्पून जो तिच्यावर प्रेम करतो, त्यास निष्कारण निरंतर अति त्रास देत असते. व याप्रमाणें तिच्यावर अनन्यभावें प्रेम करणारास सर्वदां त्रास व दुःख देण्यांत तीस पराकाष्टेचा आनंद होत असतो असें स्पष्ट दिसतें. यावरून सकुमार सुंदरीची मनधरणी करणें परम दुष्कर काम आहे असें अनुभवास येतें. कित्येक कवींनीं सुंदर तरुणीस गुलाबाच्या पुष्पाची उपमा दिली आहे ती अगदीं यथार्थ होय. ही उपमा देण्यांत त्या कवींचा मुख्य उद्देश काय असेल तो त्यांचा त्यांसच माहीत; परंतु माझ्या अनुभवावरून तर या गुलाबाच्या पुष्पाची सकुमार सुंदरीस उपमा देण्याचा असा अर्थ दिसतो कीं, गुलाबाचें पुष्प जरी मनोहर दिसतें व त्याचा सुगंध संतोषदायक व आल्हाददायक वाटतो, तरी तें हातीं घेतलें असतां त्याचे कांटे हातास रुपतात, त्याप्रमाणें सुंदर स्त्री आहे. लावण्यसंपन्न तरुणीच्या सौंदर्याच्या मोहांत सांपडून तिच्या निकटसंबंधानें सुख भोगण्याची इच्छा करणारास तिच्या अंतःरंगीं असलेले कंटकच टोंचूं लागून, वारंवार असह्य वेदना देत असतात, असा मला प्रत्यक्ष अनुभव आहे.

माझ्या प्राणसखीचें्ही माझ्यावरील अणुमात्र प्रेम कमी झालें नव्हतें, तरी पहिल्या दिवसांप्रमाणेंच मी तिला हांसण्या खेळण्यास झटत नाहीं. असें पाहून ती माझेवर क्षणोक्षणी रागावूं व रुसूं लागली. त्यामुळें तर माझा उदासपणा अधिक वाढत चालला. शेवटीं तिची चूक तिच्या लक्षांत येऊन, ती मला ह्मणाली प्राणसख्या, आपण आपणास ज्या कायद्यांनीं बांधून घेतले आहे, ते मनुष्य जन्मप्रकृतीच्या बरेच विरुद्ध आहेत. तुम्हांस तमच्या ममताळ मातापि-

तरांची वरचेंवर आठवण होत असेल. तसेंच तुह्मी आकस्मित नाहींसे झाल्याकारणानें त्यांसही परमावधीचें दुःख होत असेल. शिवाय प्रथम एकवेळ विषयाची मेजवानी अनुभवल्यानंतर उल्हासानें दुसरीस आरंभ करण्यापासून आनंद वाटण्यासारखी शरिरांत रंगेल चळवळ येण्यास्तव जो मध्यंतरी वेळ जाणें स्वभावतः जरूर असतो, तो कोणत्या तरी उपयुक्त उद्योगधंद्यांत घालविणें अगदीं वाजवी आहे. व आपल्या विवाहाच्या गोष्टीची परिस्फुट करण्याचा काल केव्हांतरी आगेमागें येणार आहे, तोंपर्यंत तुह्मी आपला धंदा सचोटीनें करून लोकप्रीति व योग्यता ही संपादन करणें अत्यंत महत्वाचें आहे. यास्तव आपण अनुभवशून्यतेनें प्रथम प्रेमभरांत जे क्रूर कायदे केले होते. ते फिरविण्याचा आतां समय आला आहे. आतां तुम्हीं आपल्या मातापितरांस भेटण्यास जाऊन पूर्वीप्रमाणें उद्योगधंदा करण्यासही आरंभ करावा. मात्र मी स्वमुखानें आपलें नांव सांगीपर्यंत तें समजून घेण्याचा प्रयत्न करूं नये! व माझी ह्मातारी दाई तुम्हांस बोलविण्यास येईल, तेव्हां तुम्ही तिच्या बरोबर माझ्या भेटीस यावें! इतकें मला सांगून त्या सौंदर्यलतिकेनें त्या म्हातारीस मला पोहोंचविण्यास सांगितलें. तिनें पूर्ववत माझे डोळे बांधून त्याच देवालयांत मला नेऊन सोडून दिलें.

त्या देवालयांतून मला मातापितरांस भेटण्यास जाण्याची इतकी कांहीं उत्कंठा झाली होती कीं, मी आपल्या घराजवळ जाईपर्यंत माझे डोळे उघडे असतांही मला रस्त्यांत कांहीं एक दिसलें नाहीं. मी आपल्या वाड्याच्या जवळ गेलों, तेव्हां मला शेजारीण भेटली. मला पहातांच तिनें हटकून उभें करून ती ह्मणाली **प्रेमसागरा** तूं इतकें दिवस कोठें गेला होतास? तूं नाहींसा झाल्यावर तुझ्या मातापितरांनीं तुझा पुष्कळ शोध केला, परंतु तुझा पत्ता लागला नाहीं! ह्मणून तूं कोणत्या तरी अपघातांत सांपडून तुझा प्राणांत झाला असेल, या विचारानें तुझी आई तर अति शोकानें व्याकूळ होऊन, तिचा कंठी प्राण उरला आहे. तरी तिच्यासमोर तूं आकस्मित जाऊं नकोस!

असें शेजारणीचें भाषण ऐकून तर मी विशेष उत्कंठेनें वाड्यांत शिरलों. प्रथम मी आपल्या बापास भेटलों. त्यानें मला प-

हातांच त्यास अत्यानंद झाला. तो मला म्हणाला बाळा, तुला कोठें जावयाचें होतें, तर प्रथम घरीं येऊन कोठें जातोस? कां जातोस? केव्हां परत यावयाचें? वगैरे गोष्टी नीट समजून सांगून मगतरी जावयाचें होतें! बरें असो; पुनः असें करूं नको! जरा थांब येथें! मी सुचवीपर्यंत तूं आंत येऊं नको! इतकें माझ्याशीं बोलून तो अंतरगृहांत गेला. व थोड्यावेळानें त्यानें मला एका दासीस बोलविण्यास पाठविलें. मी आईस भेटलों, त्यावेळीं तिला जो आनंद झाला, त्याचें कोणी वर्णन करावें? मातेचाच तो आनंद!! त्यास दुसरी उपमाच नाहीं! माझी आई जरा शांत झाल्यावर माझ्या प्राणसखीनें माझ्या प्रेमळ आई बापांस जितक्या गोष्टी सांगण्याची मला परवानगी दिली होती, म्हणजे माझे चित्तचोर चकोरणीनें नांव, पत्ता शिवाय करून जितकें मी पाहिलें व अनुभविलें तें सर्व सांगितलें. व माझ्या जिवलगेच्या सुचनेप्रमाणें त्या गोष्टीची परिस्फुटता न होऊं देण्याविषयीं त्यांस बजाविलें. माझें भाषण ऐकून आई म्हणाली, तुला वाईट वाटण्यासारखी आमच्या हातून कोणतीच गोष्ट व्हावयाची नाहीं. परंतु तुझ्या हकिगतीवरून तुला एखादी इंद्राची अप्सरा भेटल्याप्रमाणें दिसतें!

दुसरे दिवशीं मी आपलें दुकान उघडून पूर्वीप्रमाणें उद्योगधंद्यास आरंभ केला. परंतु दोन दिवस संपेपर्यंत मात्र माझें मन दुकानांत मुळींच नसून, एका मनोहर मुखकमलानें आकर्षून पक्षाप्रमाणें आपल्या सभोंवतीं घिरट्या घालण्यास लाविलें आहे हें मी कोणाच्याही अगदीं लक्षांत येऊं दिलें नाहीं. परंतु तिसरे दिवसापासून माझें मन इतक्या भराऱ्या मारूं लागलें कीं मी गिऱ्हाईकांस मागितलेला माल दाखविणें, त्यांस त्याची किंमत सांगणें वगैरे प्रकार त्यांच्याशीं बोलतां बोलतां मी विसरून जाऊन त्या लावण्यमंजरीच्या विचारांत निमग्न होऊन भ्रमिष्टाप्रमाणें त्यांच्या मुखाकडे पहात बसे. व त्यांनीं पुनः पुनः एखादी गोष्ट सांगितली किंवा विचारली असतां, त्यांचा उद्देश व अर्थही मुळींच माझ्या लक्षांत न येऊन बहिऱ्याप्रमाणें काय? काय? म्हणून वारंवार त्यांस प्रश्न करी. अशी माझ्या मनाची अस्वस्थ स्थिती पुष्कळ लोकांच्या लक्षांत येऊं लागली. तात्पर्य त्या सुंदरीशीं बोलल्या, केल्या

सुखाची आठवण करण्यांत किंवा पुनः तिची भेट झाली असतां काय बोलावयाचें? कसें करावयाचें? व केव्हां करावयाचें वगैरे प्रकारचे विचारांत मी अगदीं तल्लीन होऊन जाई. व दुसरें मला कांहीं सुचत नसे.

याप्रकारची माझ्या मनाची स्थिती दिवसेंदिवस वाढत चालली. शेवटीं मी या लावण्यसुंदरीस सोडून आल्यास सुमारें दहा दिवस झाल्यावर ती म्हातारी माझ्याकडे येऊन पूर्वोक्त बंदोबस्तानें ती मला या मनोवेधक स्थलीं घेऊन गेली. माझी प्राणसखी माझ्या दृष्टीस पडतांच मला अत्यानंद झाला, तसाच तिलाही झाला. नंतर पुनः आठदहा दिवस मी तिच्या संगतीं स्वर्गसुखवत् अवर्णनीय आनंदांत काल घालविल्यानंतर पुनः परत मी आपल्या घरीं येऊन नित्याप्रमाणें कामकाज पाहूं लागलों. या प्रमाणें कित्येक दिवस मी प्राणसखीच्या संगतीं तिच्या रंगमहालांत विषय रंगांत दंग होऊन जाई. व कित्येक दिवस मोठ्या संकटानें तिच्या विरहाग्नींत तळमळत असतां मी आपल्या मातापितरांजवळ राहून मोठ्या दुःखानें उद्योगधंद्यांत निमग्न राहण्यास झटून कसेंबसें दिवस कंठी. इतक्यांत याही क्रमांत मक्षिकापात् झाला.

माझ्या जिवलगेची मुख्य दासी **चिमणी** नांमें होती. ती मोठी लावणी, पंचरंगी तरुणी होती. तिनें आपल्या धनीणीची आपल्या लाघवी चातुर्यानें इतकी प्रीति संपादिली होती कीं तिच्या सांगीप्रमाणें ती बहुधा निरंतर वागत असे. **चिमणी** बरीच खेळलेली असून तिचें एक नाजूक बिंग माझ्या समजण्यांत आलें हें तिच्या लक्षांत होतें. ह्मणून ती माझें शत्रुत्व करूं लागली होती. परंतु सुंदर स्त्रियांची निंदा करण्याची माझी आता लहर लागत नाहीं. यास्तव तिची नाजूक गोष्ट येथें सांगत बसणें मला रास्त वाटत नाहीं. शिवाय एखाद्या दंपत्याचें परस्परांवर पराकाष्ठेचें असलेलें प्रेम चंचल मनाच्या स्त्रीस बिलकूल आवडत नाहीं. एकंदरींत ती माझ्या स्त्रीची लाडकी **चिमणी** माझा गुप्तरीतीनें द्वेष करीत होती. ती स्त्रीपद्धतीवर शिघ्र कवित्व कला जाणत होती. एके दिवशीं ती बहुरंगी **चिमणी** तालसुरांत गायन करीत असतां माझी वल्लभा आनंदभरांत येऊन ती तीस ह्मणाली **चिमणें** माझ्या प्राण-

सख्याच्या एकनिष्ठ प्रेमाबद्दल एक उत्तम नवीन गाणें करून ह्मण! असें भाषण ऐकून ती चपला धनीणीस ह्मणाली पुरुषांच्या प्रीतीच्या स्तुतीपर गाणें करावयाचें नाहीं व ह्मणावयाचें नाहीं, असा माझा कृतसंकल्प आहे. कारण, पुरुषाच्या कृतघ्नतेबद्दल व विश्वासघातकीपणाच्या अनेक गोष्टी माझ्या पहाण्यांत व ऐकण्यांत आल्या आहेत. यास्तव पुरुषावर कधीं भरंवसा ठेवूं नये व यांची स्तुती केली असतां खोटें बोलण्याचा दोष लागेल, असा माझा पूर्ण समज झाला असल्यामुळें मी शपथ घेतली आहे. असें त्या दांभिक तरुणीचें भाषण ऐकून माझी प्रेमासक्त स्त्री ह्मणाली दुसरे पुरुष कदाचित् तसे असतील. परंतु माझा जिवलग तशा प्रकारचा मनुष्य नाहीं. तेव्हां ती चपला ह्मणाली बाईसाहेब! काय आपलें भाषण? आपणास अजून पुरुषाच्या नीचपणाचा जादूचा व कापट्याचा अनुभव नाहीं ह्मणून आपण असें बोलतां दुसरें कांहीं नाहीं! पुरुष हे विलक्षण जादूविद्येंत निष्णात असतात त्यांनीं कसें चांगलें दाईट केलें तरी त्यांच्या जादूच्या प्रभावा आह्मास तें गोड वाटतें. व शेवटीं गळा कापतात. मी तुह्मांस ए गोष्ट सांगतें. ती ऐकून मी ह्मणतें तें सर्वांशीं खरें आहे अशी तुमची खात्री होईल. इतकें बोलून तिनें पुढील गोष्ट सांगण्या आरंभ केला:—

## विचित्रपालाची विचित्र जादू.

पांच पन्नास वर्षांमागें अमरावती शहरांत १७।१८ वर्षां एक पोरका तरुण रहात होता. तो ७।८ वर्षांच्या वया होतांच त्याचीं मातापितरें अत्यंत दारिद्र्यावस्थेंत निवर्तलीं होतीं तेव्हांपासून त्यानें मधुकरी मागून आपला कसाबसा उदरनिर्वाह करून थोडीबहुत लिहिण्या वाचण्याची विद्या संपादिली होती



नांची चाकरी करून उपजिविकाची सोय लावण्याचा विचार करून त्या प्रयत्नास तो लागला होता. पांच, सात ठिकाणीं चाकरी करितां आपटधोपट केल्यानंतर तो त्या शहरांतील **देवीदास** नामें एका सधन व प्रसिद्ध व्यापाऱ्यास जाऊन भेटला व त्यास आपली दुःखद जन्मकथा सांगून निर्वाहार्थ चाकरी करण्याचा उद्देश कळविला. **देवीदास** स्वभावतः अति भोळा, उदार व परोपकारी होता. त्यानें **विचित्रपाला**ची हृदयद्रावक जन्मकथा ऐकून, त्यास त्याची करुणा आली व त्यानें त्यास आपल्या पेढीवर चाकरीस ठेविलें.

**विचित्रपाल** जन्मतः कुशाग्र बुद्धिचा असून व्यवहार ज्ञानाची पुरी माहिती होण्याची व मानवस्वभावाच्या परिक्षणाचें उत्तम व खरें वर्म साध्य करून देणारी जी दारिद्र्यावस्थेची शाळा तींत बाल्यदशेपासून वाढल्यामुळें यजमानानें सांगितलेलें काम वेळच्यावेळीं, चोख रीतीनें बजावून, अल्पावकाशांत त्यानें बालंबाल मर्जी संपादिली. व त्या क्रमाक्रमानें वाढतां वाढतां सात, आठ वर्षांच्या अवकाशांत तो तरुण **देवीदासा**च्या पेढीवर मुख्य मुनीम झाला. मुनिमाचें काम करीत असतांही यजमानास त्यानें एक, दोन वर्षांच्या काळांत पुष्कळ फायदा करून दाखविला व त्या म्हाताऱ्यास पुत्रसंतती नसल्यामुळें त्यानें त्यास भागिदार करून दुकानसंबंधाची सर्व देखरेख व मुखत्यारी पूर्णपणें दिली. व आपलें वृद्धापकाळचें आयुष्य स्वस्थ बसून शांततेंत भजनपूजनांत घालविण्याचा विचार केला.

या वर सांगितलेल्या गुणांशिवाय **विचित्रपाला**नें एक सबळ अद्भुत गुण किंवा विद्या संपादिली होती, ती हींच होय कीं, तो मोहनीची जादू शिकला होता. व त्या विद्येच्या प्रयोगानें तो विलक्षण प्रकारें कार्य साध्य करून घेत असे. कोणी मनुष्य कितीही क्रोधायमान होऊन किंवा द्वेषभावानें त्याच्यासमोर गेला असतां, दोन शब्दांच्या मंत्रानेंच त्यास वश करून, आपल्या मर्जीप्रमाणें वागण्यास लावी. त्यांतून पुरुषांपेक्षां स्त्रियांवर तर त्याच्या मोहनी मंत्राचा आश्चर्यकारक प्रकारें प्रयोग लागू पडत असे. एखादी लावण्यलतिका सात मजल्याच्या माडीवर दहा पडद्यां आड कां बसली असेना व

लाच्या ती दृष्टीस पडली, व त्यानें तिच्याकडे वांकडी नजर फिर-
विली कीं, ती तरुण सुंदरी हांसत, लाजत, मुरडत, ठमकत, ठुम-
कत त्याच्या समोर उभी राहून, प्रेमभरानें त्याच्या कंठांत मिठं
घालण्यास लगेच सिद्ध होई. असा विचित्र मोहनी मंत्र त्याचा होता.
बाईसाहेब; ज्या आधारानें मी ही **विचित्रपालाच्या विचित्र**
जादूची गोष्ट सांगतें, त्यांत या त्याच्या मोहनीच्या जादूसंबंधानें
लोक समाजाचीं दोन मतें झालीं असलेलीं नमूद केलेलीं आहेत
ज्यसां ज्ञानसंपन्नतेबद्दल, मोठी बमेंड होती, ते लोक असें ह्मणत
कीं, कसली जादू व कसलें काय? जादू हा शब्दच अज्ञानी
लोकांनीं आपल्या निरर्थक कल्पनातरंगांतून ओढून काढिला आहे
**विचित्रपाल** फक्त तीक्ष्ण बुद्धिचा मनुष्य असून, तो दारिद्रावस्थेंत
वाढल्यामुळें त्यास नानाप्रकारच्या मनुष्यांशीं प्रसंग पडून, व्यवहार
ज्ञान व मनुष्य स्वभावाचें परिक्षण करणें, फार उत्तम साध्य झालें होतें
व सर्व साधारण मनुष्यांत असणारीं कित्येक व्यंगें त्यानें पुरीं लक्षांत
ठेविलीं होतीं. व तो मनुष्याच्या नजरेवरून व मुद्रेवरून त्याच्या
अंतःकरणांत कोणत्या प्रकारचे विचार घोळत आहेत हें लगेच ओळ
खित असे. शिवाय प्रत्येक मनुष्यास आत्मस्तुती अत्यंत प्रि
असते; एका मनुष्याच्या मनांत दुसऱ्याबद्दल कोणत्या त
प्रकारचें वाईट विचार असावयाचेंच ते ओळखून त्यांचा योग्य प्रसं
उपयोग करणें योग्य; लोभ व काम हे विकार मनुष्याच्या अंतःक
णांत कशा प्रकारें जागृत असतात; या विकारांस उत्तेजक भापणानें म
हांत पकडून, कोणत्यावेळीं कसा फायदा करून घ्यावा; पुरुषांपे
स्त्रियां भोळसर, ग्राहक, प्रेमळ व आनंदप्रिय विशेप असतात. त्य
विनोदी भाषणानें हंसविणें व प्रेमरसानें ओतप्रोत भरलेल्या गो
सांगणें, एका सुंदरीस दुसरीवर असलेलें प्रेम प्रसंगानुरुप दाखवि
इत्यादि खुब्या तो अत्यंत मार्मिकतेनें जाणत असून तो वे
ज्यावेळीं मोठ्या चातुर्यानें त्यांचा उपयोग करून आपला उद्दे
साध्य करून घेत असे. हीच **विचित्रपाला**जवळ जादू हो
असें बहू शहाण्या लोकांचें ह्मणणें होतें.

दुसऱ्या प्रकारचे लोक जे तुमच्या माझ्यासारखे भोळे हे
त्यांची अनेक गोष्टीवरून अशी पुरी खात्री झाली होती



त्यांस कांहींतरी अलौकिक जादू विद्याच साध्य झाल्याशिवाय तो अगदीं हीन दशेंतून इतक्या त्वरीत भरभराटीस आला नाहीं. तो अति नीच वर्तन करीत असून त्यास बहुतेक सर्व पुरुष मोठा शहाणा समजून; त्याचा अत्यंत सन्मान राखीत. व सर्व तरुण सुंदरी त्याच्यावर अंतःकरणपूर्वक प्रेम करीत; अनेक तरुणींस तर हजारवेळ बजावून, बजावून सांगितलें कीं, **विचित्रपाल** मोठा विचित्र स्त्री भक्षक आहे. त्याची कोणत्याही स्त्रीची ओळख झाली असतां, तिच्याकडून मटकन प्रेमगुटिका गिळविल्यावांचून कधीं सोडीत नाहीं तरी त्या ऐकत नसत. व कित्येकांनीं तर त्याचीं अशा प्रकारचीं अनेक कृष्णकारस्थानें स्वनेत्रांनीं पाहिलीं होतीं, त्या तर मुद्दाम त्याच्या गळीं जाऊन पडत. या विलक्षण गोष्टी जादू विद्येशिवाय कशा साध्य होतील? बाईसाहेब कित्येक शहाणपणाच्या वृथा ऐटीनें कांहीं ह्मणोत, माझें मत तर शेवटून सांगितलेल्या लोकांप्रमाणेंच आहे. ह्मणजे कोणत्या तरी प्रकारची **विचित्रपालास** विचित्र जादू प्राप्त झाली होती, ही गोष्ट अगदीं सत्य होय. कारण, सुंदर स्त्रियांप्रमाणें जारकर्माचा तिरस्कार करणाऱ्या अनेक तरुणी इतक्या झटपट त्यास कधीं वश झाल्या नसत्या.

**विचित्रपालानें** व्यापाराच्या कामीं चलाखी व हुशारी दाखवून **देवीदासा**कडून थोडक्याच दिवसांत आपली बढती करून घेतली. व जादू विद्येच्या साह्यानें किंवा लाववी व दांभिकपणाच्या वर्तनानें त्यास मोहनी घालून आपलीं व्यंगें व दुर्गुण बिलकूल त्याच्या लक्षांत कधीं येऊं दिले नाहींत. **देवीदासास** पुष्कळ लोक सांगत कीं **विचित्रपाल** ज्यार, चोर, लबाड, विश्वासघातकी वगैरे सर्व प्रकारच्या दुर्गुणांनीं परिपूर्ण आहे, तरी त्यास तुह्मी आपल्या बायकांपोरांत वागूं देऊं नका! पैसा आडक्याचें जोखीम त्यांच्यावर विसंबूं नका? परंतु **विचित्रपाल** त्यास ज्या ब्रह्मज्ञानाच्या व सद्गुणांच्या आवळपवळ गोष्टी सांगे त्या ऐकून, तो अगदीं थक्क होऊन जाऊन त्या विरुद्ध दुसऱ्यांनीं हजारों गोष्टी सांगितलेल्या त्यास खोट्या वाटत. त्याचा असा समज होईकीं त्या गरीब पोरास मी थोड्या दिवसांत नांवारूपास आणिलें ह्मणून मत्सरी लोकांस त्याचें वाईट वाटून खोट्यानाट्या त्याच्या नालस्त्या सांगतात.

हा प्रकार **विचित्रपाल** पूर्णपणें जाणत होता. यास्तव तो **देवीदासास** आपल्या वर्तनाविषयीं शंका येऊं नये एतदर्थ पराकाष्टेची दक्षता घेत असे. बाकी तो आपल्या विषयसुखाच्या, चैनीच्या व आनंदाच्या क्रमांत काळ घालविण्यांत बिलकूल कसूर करीत नव्हता. व जसजशी त्याची प्राप्ती वाढली, तसतसा खर्चही वाढल होता, इतकेंच नव्हे, पण त्याचा अयापेक्षां व्यय पराकाष्टेचा अधिक होता, त्यामुळें तो निरंतर पैशाच्या तंगींत असे. यास्तव तो मुख्य मुनीम झाल्या दिवसांपासून खोटा जमाखर्च करणें, खोटा दस्तायवज करणें वगैरे प्रकाराला सुद्धां सुरवात झाली होती.

या शिवाय **विचित्रपालानें** दुसऱ्या एका प्रकारें देवीदासाच्या घरांत भोंक पाडलें होतें. देवीदासाची प्रथम स्त्री वारली असून, त्यानें द्वितीय संबंध केला होता. ती द्वितीय संबंधाची स्त्री अत्यंत तरुण व रूपसंपन्न होती. तिच्यावरही त्या लाघवी जादूगारानें आपल्या विचित्र मायेचा प्रयोग केल्यामुळें, ती त्या दुराचारी तरुणास तन, मन, धनें करून वश झाली होती. परंतु त्या बिचाऱ्या म्हाताऱ्या व भावार्थी **देवीदासा**च्या ध्यानीं मनीं व स्वप्नींही हें प्रकरण कधीं आलें नाहीं.

वेश्यागमन, मद्यपान व द्यूत, या तीन दुर्व्यसनांनीं द्रव्याचा जो फन्ना उडतो तो अतर्क्य होय. या तीन दुर्व्यसनांपैकीं एखादें जरी **विक्रमा**सारख्या सार्वभौम राजासही जडलें असलें, तरी त्यासही कोणत्या वेळीं तें कसें धुळधानीस मिळवील, त्याची कल्पना करणें अशक्य. त्यांतून **विचित्रपाला**प्रमाणें एका व्यापाऱ्याच्या पोटबाबू मुनिमाची वेश्याच्या छंदानें दुर्दशा उडाली यांत आश्चर्य तें काय? **विचित्रपालानें** आपल्या मोहक जादू विद्येच्या प्रभावानें अनेक स्त्रियांचें प्रेम संपादून तन, मन, धनें करून, त्यांस आपल्या अंकीत करून घेतलें होतें. तथापि जगांत सर्वत्र शेराला सव्वा शेर भेटतो, या न्यायानें **विचित्रपाला**सही एक सवायी जादुगार वेश्या भेटली होती. तिनें आपल्या जादू विद्येचा पुरा पगडा त्याच्यावर बसवून, त्यास अनन्वीत कर्मास उद्युक्त करून, ती खोऱ्यानें त्याच्यापासून पैसा उकळीत होती. त्यामुळें त्यानें दांभिकपणानें **देवीदासा**ची मर्जी प्रसन्न करून, व्यापाराचीं सर्व सुत्रें आपल्या आधीन करून

घेतांच, दुकानांत खोट्यानाट्या दस्तऐवजाचा व जमाखर्चाचा भरणा होऊन, सर्व रोकड व जड जवाहीर नाहींसें होऊन, त्या वेश्येच्या घरांत शोभिवंत व मौल्यवान सामानसुमान भरण्यांत, तिला बहुमुल्य वस्त्रालंकार घेण्यांत व्यय होऊं लागला. कारण, जो दुसऱ्याकडून अन्यायानें द्रव्य काढतो, त्याचा व्ययही बहुधा अव्यवस्थीत होतो. त्यामुळें अखेरीस दुकानांत केवळ कोरडा भपका राहून "बडा घर पोकळ वासा" अशी स्थिती झाली. शेवटीं पापाचा घडा भरला! एके दिवशीं **देवीदासा**च्या दुकानावर दिल्ली शहरच्या एका व्यापाऱ्याच्या एक लाख रुपयांच्या हुंड्या खड्या राहिल्या.

आपल्या दुकानीं एक लाख रुपयांच्या हुंड्या खड्या राहिल्या, असें समजतांच **देवीदास** घाबरला; व आपलें भजन पूजन आटोपून दुकानीं जाऊन पाहूं लागला, तों **विचित्रपाला**चा पत्ता नाहीं! कागद पत्रांस मेळ नाहीं! कित्येक व्यापाऱ्यांच्या नांवावर मोठमोठ्या रकमा लिहिल्या होत्या, त्यांच्याकडे तगाद्यास पाठविले असतां, ते आह्मी तुमचें कांहींएक लागत नाहीं, असें सांगून **विचित्रपाला**च्या सहीच्या भडाभड पावत्या काढून दाखवूं लागले! ह्मणून अब्रु रक्षणार्थ घाबऱ्या घाबऱ्या तो ह्मातारा घरी येऊन, मोठ्या चाचडीनें आपल्या विवाहीत लाडक्या तरुण सुंदरीपासून किल्ल्या घेऊन, तिजोरी उघडून रोकड पाहूं लागला, तों ती रिकामी ठणठणीत ह्मणून त्या आवडत्या व विश्वासू सुंदरीस रोकड काय झाली असें विचारतां, तिनें उत्तर दिले मला काय माहीत? नेली असेल चोरांनीं! शेवटीं नाइलाज जाणून महत दुःखानें आपल्या प्रियकरणीच्या अंगावरील बहुमोल सोन्याचे व जवाहिरांचे दागिने विकून रकमेची भर गडबडीनें करण्याचा तो विचार करूं लागला असतां, जे दागिने शंभर नंबरी सुवर्णाचे होते, ते सोनपितळेचे झाले! ज्यावर मोठ मोठ्या रकमेची रत्नें जडलीं होतीं, त्यावर नुसते पैलूदार काचेचे खडे बसविले आहेत असें आढळून आलें! असा फेरबदल दागिन्यांत होण्याचें कारण त्या प्रेमासक्त तरुणीस विचारले, तेव्हां तिनें चणचणीत उत्तर दिलें कीं, पिशाच्य बाधेनें तसा मोबदला झाला असेल, त्याला मी काय करूं? हा जबाब ऐकून बिचाऱ्या **देवीदासास** परमावधीचें [illegible]

आत्महत्त्या करण्याचा विचार करूं लागला. यावरून **विचित्रपालाच्या** संगतीमुळें जर हे प्रकार घडले तर त्यास जादू येत नव्हती असें ह्मणण्याचें कोण धैर्य करितो ?

**विचित्रपालानें** केवळ **देवीदासाचें** दुकानांतच मात्र गोंधळ केला होता असें नाहीं, तर जेजे पुरुष त्याच्या झपाट्यांत सांपडले होते, त्यांच्याशीं अनेक प्रकारच्या लांड्या लबाड्या करून पैसे उपटले होते. व ज्या सुंदरी त्याच्या नजरेस पडल्या व ज्यांनीं त्याची लहर घेतली होती, त्यांस त्यानें विचित्र जादूच्या साह्यानें झोडल्या शिवाय कधींही सोडले नव्हते. यामुळें **देवीदासाच्या** दुकान संबंधानें **विचित्रपालाच्या** कुवर्तनाचा बोभाटा होतांच, ज्यांशीं ह्मणून त्याचा थोडाबहुत व्यवहार झाला होता, ते सर्व त्याच्या संबंधाविषयीं विचार करूं लागले. तेव्हां कोणास आपण स्वतःच दुसऱ्याच्या त्यानें सह्या करून पावत्या दिल्या होत्या; कोणास मुळींच जवळ नसलेल्या मालाचा सवदा करून, त्यांस मुदतीनें तो माल देण्याचा करार करून, बयाणा ह्मणून त्यांच्यापासून रकम उपटली होती; कोणास खोट्याच हुंड्या लिहून दिल्या होत्या; अशीं कित्येक कुलंडी दृष्टोपत्तीस आलीं. व सर्व शहरांत मोठाच गवगवा होऊन, जो तो त्यास शोधूं लागला. व त्याचा कोठें पत्ता नाहीं असें पाहून, त्यांनी त्याच्या कृष्ण कारस्थानाविषयीं सरकारांत फिर्यादी केल्या; तेव्हां महत् प्रयासानें सरकारी अंमलदारांनीं त्याच्या वेश्येच्या येथें त्यास पकडला. त्या वेळीं तिच्या घरांत एखाद्या राजाप्रमाणें संपत्ती व ऐषआरामाच्या वस्तु भरल्या आहेत असें त्यांस दिसून आलें.

नंतर **विचित्रपालावर** असलेल्या अनेक आरोपांची चौकशी सुरू झाली. तेव्हां त्याच्या जादूचा कांहीं इलाज न चालतां त्याच्यावर बरेच भयंकर अपराधाचे गुन्हे शाबीद झाले. तेव्हां त्याच्या कपाळावर "समाजबाह्य" अशा तप्त अक्षरांचा शिक्का ठोकून त्या डागाची जखम बरी झाली, ह्मणजे त्यास एका पेटींत घालून जिवंत पुरावा अशी शिक्षा झाली.

शिक्षेप्रमाणें **विचित्रपालास** पुरून एक महिना होईपर्यंत त्यास पुरलेल्या स्थलीं पाहारा होता तोंही उठला. अशी संधी पाहून [illegible] कांहीं मंत्र साध्य करण्यास मनुष्या

कवटी पाहिजे होती, ह्मणून त्यांनीं त्याचें प्रेत मध्यानरात्रीं उकरलें
तेव्हां तें नासलेलें नाहीं, असें पाहून त्यांस अत्यानंद झाला. व
त्यांनीं तें बाहेर काढून विधीयुक्त त्या प्रेताची कवटी काढण्याच्या
विचारांत ते लोक होते; इतक्यांत तें प्रेत चलनवलन करण्यास
लागलें. तो प्रकार पाहून ते सर्वजण भिऊन पळून गेले.

ते जादुगार पलायन करून गेल्यावर, **विचित्रपाल** आपल्या
जादूविद्येच्या साह्यानें, किंवा मांजरा प्रमाणें त्यास शंभर जीव होते
नकळे? सुमारें अर्ध घटकेनें नेत्र उघडून आसपास पाहूं लागला
असतां, त्यास आपणास पेटींतून बाहेर काढिलें असून, सभोंवती लिं
कापून त्यास शेंदूर वगैरे लावून टाकिली आहेत; उद जळत असू
त्याचा घमघमाट सुटला आहे; कित्येकजणांचीं अंगावरलीं वस्त्रें
जवळच पडलीं आहेत, वगैरे प्रकार पाहून प्रथम तें काय प्रकरण
आहे, हें त्याच्या लक्षांत येईना. थोड्या वेळानें त्यास शिक्षा वगैरे
झाल्याची आठवण होऊन, तो लगबगीनें उठला. व जवळपास कोणी
नाहीं असें पाहून तेथें असलेलीं वस्त्रें अंगावर घालून तेथून निघून गेला

अमरावती पासून सुमारें पांच कोसावर विजयपुरी नामें एक
टुमदार शहर होतें. तेथलि संस्थानिक **दयाघन** नामें करून
होता. तो एके दिवशीं प्रातःकाळींच उठून आपल्या वाड्याच्या
बाहेर आला तों कोणी एक मनुष्य आपल्या दारांबाहेर पाहिऱ्यां-
वर अव्यवस्थीत रीतीनें पडला असून, त्याच्या शरिरास ठिकठिका-
णी जखमा झाल्या आहेत; व तो अगदीं बेशुद्ध आहे; तथापि
त्यास धुगधुगी आहे, असें पाहून त्यास त्याची दया आली. व त्या-
च्या तोंडांत त्यानें पाणी घालून त्यास सावध केला, व आपल्या येथें
ठेवून घेतला. नंतर आठ दहा दिवसांत त्याच्या अंगावरील जखमा
वगैरे बऱ्या होऊन, त्याची प्रकृतीही बरीच सुधारल्या नंतर, **दया-
घनानें** त्यास त्याची हकिकत विचारली असतां, तो ह्मणाला काय
सांगूं माझें दुःख? मी कनकपुरचा रहाणारा! तेथें थोड्या दिवसांपूर्वीं मी
आपल्या कुटुंब पोषणार्थ प्रामाणिकपणानें धंदाकरून मीठ भाकरी
खाऊन, आनंदानें कालक्रमण करीत होतों. परंतु आकस्मित एक
रोगाची साथ उद्भवली; त्यांत माझी प्रेमळ स्त्री व दोन मुलें आजारी
पडून एक दोन दिवसांच्या आवकाशांतच त्यांचा निकाल झाला.

यास्तव मला अति औदासिन्यता प्राप्त होऊन, मी आपला उद्योग धंदा आटोपून, चार पांच हजार रुपयांची रोकड जवळ जमा झाली होती, ती बरोबर घेऊन काशीस भागीरथि तिरीं राहून, हरी हरी ह्मणून उरलेलें आयुष्य घालवावें असा निश्चय करून प्रवासास निघालों, तों येथून १५।१६ कोसांच्या अंतरावर जें अरण्य लागतें, तेथें चोरांनीं मला गांठून बेदम मारून माझ्या जवळ होतें, नव्हतें तें सर्व घेऊन ते निघून गेले. चोर गेल्यावर मी महत् प्रयासानें त्या अरण्यांतून निघून येथपर्यंत येऊन दाखल झालों. पुढील हकिकत तर आपण सर्व जाणतच आहांत! इतकी हकिकत सांगून झाल्यावर, तो ह्मणाला महाराज, हें शेवटलें संकट माझ्यावर ओढवल्यापासून या पुढें काय करावें व काय नाहीं, हें मला सुचत नाहीं. व तो खळखळा नेत्रांतून आश्रु गाळूं लागला. तो प्रकार पाहून **दयाघनास** त्याची अतिशय करुणा आली. व तो त्या परकीय मनुष्यास ह्मणाला, बाबारे सुख, दुःखें हीं ईश्वरी नियमानुसार प्राप्त होतात. तसेंच कोणतीही चांगली गोष्ट करण्याचा विचार करणें, हें मनुष्याच्या आधीन असतें खरें, तथापि त्या विचाराची पूर्णता होणें, सर्वांशी ईश्वराच्या इच्छेवर अवलंबून आहे; असें अनेक प्रसंगीं ह्मटल्याशिवाय दुसरा इलाजच नाहीं. तरी **ईश स**त्तेनें माझ्या येथें खाण्यापिण्याची वगैरे कोणत्याच गोष्टीची प्रतिकुलता नाहीं. यास्तव तुला वाटेल तितके दिवस तूं माझ्या येथें रहा! तूं आणखीं कांहीं दिवस येथें स्वस्थतेनें राहिल्यानंतर तुझें येथें मन रमल्यास व तुला कांहीं उद्योगधंदा करावासा वाटल्यास तुझ्या लायक तुला उद्योगही मिळेल! असें **दयाघनाचें** भाषण ऐकून, तो परकीय मनुष्य त्यास ह्मणाला महाराज आपले माझ्यावर बहुत उपकार झाले आहेत. व आपण पुत्रवत् माझ्यावर प्रेम करितां व अझून माझी प्रकृती चांगली सुधारली नाहीं. एतदर्थ तूर्त आपल्या सांगण्याप्रमाणेंच वागणें मला रास्त दिसतें.

याप्रमाणें **दयाघनाचें** व या मनुष्याचें भाषण झाल्या वेळेपासून तो वृद्ध संस्थानिक त्यावर आपल्या घरच्या मनुष्याप्रमाणें प्रीति करूं लागून, त्याप्रमाणेंच सर्वांनीं त्याच्याशीं वागावें अशी त्यानें घरांतील मनुष्यांस ताकीत दिली. त्या दिवसांपासून त्या प्रकारचे

त्या संस्थानिकाच्या घरांत बरेंच प्रस्त वाढलें. तथापि तो मनुष्य बहुधा कोणा घरांबाहेरील मनुष्याचे दृष्टीस फारसा पडत नसून, त्याच्या शरिरावरील बहुधा सर्व जखमा बऱ्या झाल्या होत्या, तरी तो आपल्या कपाळावर एक मोठी जखम झाली आहे ह्मणून तो सांगत होता, ती वरील पटा तो कधीं सोडीत नसून ती कोणास दाखवित नसे. याविषयीं कित्येक मनुष्यांस अतिशयच चमत्कार वाटे.

हा परकीय मनुष्य आमच्या ओळखीचा **विचित्रपाल**च होता. त्या संस्थानिकाच्या घरांत २०।२५ दिवस राहिल्यानंतर तो त्याच्या घरांतील मनुष्यांत अगदीं मिसळून गेला; तेव्हां त्यास आपल्या जादूची आठवण होऊं लागलीसें दिसतें. **दयाघना**च्या मुदबतखान्यांत ज्या कित्येक तरुण व सुंदर विधवा होत्या व त्याच्या पत्नीच्या व कन्येच्या ज्या अनेक सुंदर व तरुण दासी होत्या, त्याच्या समाजांत तो गोकुळांत जसा कृष्ण रंग उडवीत होता असें ह्मणतात, तसा त्यानें क्रम सुरू केला.

**दयाघन** अत्यंत सुस्वभावी व कोमळ अंतःकरणाचा होता. त्यास एखाद्या मनुष्यानें दंभानें काल्पनिक दुःख सांगितलें, तरीही करुणा येऊन, तो त्याच्या त्या काल्पनिक दुःखाचें निवारण करण्यास झटत असल्यामुळें त्याच्याजवळ चांगल्यापेक्षां वाईट चाकरांचा पुष्कळ भरणा झाला होता. व वाईट मनुष्यांस विशेष स्वातंत्र्य प्राप्त झालें, तर ते अधिक आपले गुण उधळूं लागतात. त्याच्या सर्व चाकरांत **विचित्रपाल** विशेष बुद्धिवान, तेजस्वी व सुस्वरूप असल्यामुळें थोड्या वेळांतच त्यानें सर्व चाकर नौकरांचें धुरीणत्व संपादिलें. व तो मनुष्याच्या मनाचा उत्तम परिक्षण असून, प्रत्येकाच्या मनांत आलेली कल्पना केवळ त्याच्या मुद्रेवरून ओळखून, त्यास उत्तेजन देण्याची त्याची वहिवाट असल्यामुळें तो बहुतेक चाकरांस विशेष आवडूं लागला होता.

एके दिवशीं दोन प्रहरच्यासमयीं **दयाघना**च्या मुदबतखान्यांतील अमलदारांचें (स्वैपाकणी, न्हाहणी वगैरे) चामुंडामंडळ व जनानखान्यांतील दासीमंडळ यांनीं आपापलीं कामकाजें आटपून तीं रंगांत येऊन गप्पाष्टक झोडीत बसलीं असतां, **विचित्रपाला**ची स्वारी तेथें जाऊन त्यांची थटामस्करी करूं लागली. तेव्हां एक

तरुण स्वयपाकीण खुलून तिनें त्यास एक लाडू व दुधांत साखर घालून तो प्याला दिला व ह्मणाली, तुह्मीं बिनदिक्कत हा लाडू खाऊन हें दूध प्या ! येथें खाण्यापिण्यास कोणासही मनाई नाहीं! असें तिचें भाषण ऐकून, **विचित्रपाल** ह्मणाला, माझ्या समोर कोणताही खाद्य किंवा पेय मिष्ट पदार्थ आला असतां, तो मी खाण्या, पिण्यास धैर्य करीत नाहीं अगर संशय मनांत आणतों असें क्वचित्च घडतें. त्यांतून कोमल हातानें प्रेमपूर्वक दिलेल्या पदार्थांचा तर कधींच मी अनादर करणार नाहीं. पण एक लाडू कधींच मी हातीं घेत नाहीं. दोन्ही बरोबर घेतों! किंवा एक घेतल्याबर लगेंच दुसरा घेतों! अशी मला लहानपणापासून संवय आहे. असें त्याचें भाषण ऐकून, ती तरुणी हांसून ह्मणाली खरेंच कीं काय? व तिनें दुसरा लाडू काढून त्याच्या हातीं दिला.

त्यासमयीं **चंद्री** नामें दासी ह्मणाली, काय हो तुमची पहिली स्त्री वारल्यानंतर तुह्मांस वैराग्य प्राप्त झालें होतें असें तुह्मी सांगता, परंतु तुह्मी मोठे रंगेल दिसता. तुमच्या आनंदी मस्तकांत वैराग्याचें विचार फार वेळ कधींही स्थीर रहावयाचें नाहींत. तुह्मी पुनः एखाद्या सुंदरीशीं लग्न केलें असतां उत्तम होईल! असें त्या तरुणीचें भाषण ऐकून **विचित्रपाल** ह्मणाला, अगे **चंद्रे** माझें मस्तक नुसतें रंगेलच नाहीं, तें बहुरंगी आहे. त्यांत शृंगार, वैराग्य व नीति या तिन्हीची सारखींच तत्त्वें भरलीं आहेत. शिवाय शृंगार, वीर, करुण आदिकरून नऊ रसांचाही योग्य उपयोग कोणत्या वेळीं कसा करावा हें मी जाणतों! मी आपल्या यजमानाच्या समोर गेलों असतां, मला वैराग्याची आठवण होते! दुसरा कोणी नीतीचा भोक्ता आढळला असतां, मूर्तिमंत नीति माझ्या समोर उभी रहाते! तुमच्यासारख्या चैनी सुंदरी भेटल्या असतां, शृंगाराची आठवण होते! इतकें बोलून त्यानें तिच्यावर प्रेमशर सोडिला, तेव्हां मोठ्या विलक्षण खुबीनें ती सुंदरी हासूं व मुरडूं लागली, असें पाहून तो जादुगार ह्मणाला, आतां हळू! आतां पुरें! हाय रे हाय! तो प्रकार पाहून तेथें जमा झालेल्या सर्वच सुंदरी अतिशय खुलल्या. व कित्येक जणीतर नेत्रपल्लवीनें त्यास आपलें अंतरंग कळवूं लागल्या. इतक्यांत त्याचे लाडू खाऊन दूध पिऊन आटोपले. तेव्हां ज्या तरुणीनें

त्यास खाण्यास दिले होतें, ती त्यास हात धुण्यास पाणी देऊन जवळच उभी होती, तिच्या गळ्यांत त्यानें हात घालून "अन्न दाता सुखी भव" असें बोलून तिच्या दोन्ही गालाचीं चुंबनें घेतलीं. त्या समयीं त्या तरुणीनें त्याचें फारसें निवारण न करितां, ती हांसून त्यास ह्मणाली तुह्मी असें स्त्रियांच्या मृदु गालांस डसतां याची तुह्मांस लज्जा वाटणें अगदीं योग्य आहे! परंतु त्या जादुगारानें तिच्या बोलण्याकडे मुळींच लक्ष न देतां ह्मणाला, हें कृत्य पाहून या येथें जमलेल्या सुंदरी माझ्यावर रुसतील असें ह्मणतेस काय? बरें तर त्यांचाही रुसवा काढून टाकतों! असें ह्मणून त्यानें क्रमाक्रमानें तेथील सर्व तरुणींचीं चुंबनें घेतलीं. त्यावेळीं त्यांपैकीं एकीनेंही निग्रहानें त्याचें निवारण तर केलें नाहींच, परंतु उलट्या त्याच्या त्या विचित्र कर्मास आरंभ झालेला पाहून, त्या उल्हासून खी! खी!! करून हांसत होत्या. यावरून **विचित्रपालाच्या** विचित्र जादूचाच हा प्रभावच असें ह्मणण्यास कोणती हरकत? नंतर बराच वेळपर्यंत त्यांची याप्रकारें थट्टामस्करी केल्यानंतर **विचित्रपाल** तेथून आपल्या नेहमींच्या बसण्याच्या खोलींत जाण्यास निघाला त्यावेळीं त्यास असें आढळलें कीं, **दयाघनाची** तरुण व रूपसंपन्न कन्या **रतिसुंदरी** ही स्वयंपाक घरांत चाललेला सर्व प्रकार एका बाजूच्या दाराच्या फटींतून पहात होती. **रतिसुंदरीस** तारुण्य प्राप्त होऊन सुमारें एक वर्ष झालें होतें, तरीही तीस कधीं दुसऱ्या बहुश्रुत समवयस्क तरुणींचीं संगत लागलीं नव्हती. ती **दयाघनास** एकुलती एकच कन्या असल्याकारणानें त्यानें आपल्या समजाप्रमाणें उत्तम मुलगा पाहून, त्याशीं तिचा विवाह लावून देऊन, आपल्या मागें सर्व संस्थान त्याचे स्वाधीन करण्याचा विचार करून त्यास घरजावई ठेविला होता.

**रतिसुंदरीचें** अतुल्य लावण्य व लुसलुसीत नवतीचें तारुण्य पाहून, **विचित्रपालाच्या** तोंडास पाणी सुटलें होतें. परंतु तीस तिच्या पापभिरू माते शिवाय दुसरे कोणाची संगत नसून, तिच्या मनांत अज्ञानामुळें विषयसुखाच्या कल्पना मुळींच नाहींत, असें ओळखून तो जादुगार अतिशय वचकून होता. यास्तव तिनें आपण स्वयंपाक घरांत केलेले चाळे पाहिले, असें जेव्हां त्यास आढळलें तेव्हां तो प्रथम बराच डचकला. तथापि तिचे डोळे फिरले आहेत

असें त्यानें पाहिले. व तिच्या भ्रताराच्या व्यंगाबद्दल त्याच्या बोलण्या चालण्यावरून त्यास पूर्ण संशय आला होता, त्यावरून तें ठाऊक सुसाध्य होईल, असें जें अनुमान त्यानें केलें होतें याचीही त्यास आठवण झाली. त्यामुळें हास्यमुखानें तो तिच्या पुढें गेला. व आसपास कोणी नाहीं, असें पाहून तीस ह्मणाला ताईसाहेब, या दारांच्या फटींतून आपण इतकें लक्षपूर्वक काय पहात होतां? हा प्रश्न ऐकून, ती निष्कलंक मनाची बाला जरा डचकली परंतु शृंगारचेष्टांचा तीस कधीं पूर्वीं वाराही लागला नसल्याकारणानें ती अगदीं पवित्र मनानें त्यास विचारूं लागली कीं, तुह्मीं स्वयंपाक घरांत असें वेड्या वेड्यासारखें काय करीत होतां? तेथील तरुणींच्या गालांस असें डसत काय होतां? त्यांचे गाल गुच्चे काय घेत होतां? असें डोळे काय मिचकावित होतां? त्यांस मारीत काय होता! तसेंच त्या सर्व तरुणीही तुह्मी त्यांस नानापरीनें त्रास देत असतां, क्षणांत अतिशय वेदना झाल्याप्रमाणें विव्हळत, काय होत्या व क्षणांत अत्यानंद झाल्याप्रमाणें खीं खीं करून हांसत काय होत्या! मला तर तुमचे सर्वांचें तें विलक्षण चाळे पाहून, तुह्मां सर्वांसच पिशाच्य बाधा झाल्याप्रमाणें वाटलें!

असें तिचें भाषण ऐकून **विचित्रपाला**च्या पुरें लक्षांत आलें कीं, या सुंदरीस अझून पुरुषाचा हस्त स्पर्श नाहीं. व ज्यानें विषय रंग कधीं अनुभवला नाहीं, किंवा त्या चेष्टा पाहिल्या नाहींत अशा अनाण व्यक्तीच्याही तसें प्रकार अवलोकनांत आले असतां त्यास काम बाधा झाल्यावांचून कधीं रहात नाहीं. त्याप्रमाणेंच त्या अल्लड **रतिसुंदरी**ची अवस्था झाली होती. यास्तव या वेळची आपण संधी व्यर्थ वालविली, तर हिनें आतां पाहिलेले सर्व प्रकार ही आपल्या आईस सांगेल, असा विचार करून तो जादुगार ह्मणाला, ताईसाहेब आपल्या प्रश्नाचें उत्तर मी शब्दांनीं सांगण्यास असमर्थ आहे, परंतु जरा मला आपल्या अंगास हस्त स्पर्श करूं द्याल, तर तुमच्या सर्व शंकांचे क्षणांत निवारण आपोआप होईल! त्या अल्लड तरुणीनें थोड्या वेळा पूर्वीं जे रंग पाहिले होतें त्यामुळें तिचें सर्व शरिर ठणकूं लागुन, त्यास रवरवी सुटली होती. यामुळें तिनें त्यास त्याच्या मर्जीनुरूप करूं दिलें. त्यावेळीं त्या सुंदरीचें एका क्षणांत

मदनव्यथेनें नेत्र फिरून जाऊन आरक्त वर्ण झाले! सर्व शरीरास कंप सुटला! व स्वेच्छेनें मोठ्या प्रेमानें त्याचीं चुंबनें घेऊन त्यास आलिंगन देऊं लागली होती. अशी ती रंगांत आलेली पाहून, तो विचित्र जादुगार तिच्या भ्रताराच्या संबंधाच्या कित्येक गोष्टी तीस विचारूं लागला. तेव्हां ती अल्लड बाला सांगूं लागली कीं, रात्रीं आह्मीं गंध, अक्षता, पुष्पें, धूप, दीप, नैवेद्य, वगैरे षोडश उपचारें पूजनाचें साहित्य तयार करून आमच्या रंग महालांत एक कामदेवाची मूर्ति आहे, तिची आह्मीं उभयतां मिळून अनन्यभावानें पहिल्यानें पूजा करतों. नंतर आह्मीं एकमेकांचीही यथासांग पूजा करून, परस्परांच्या नैवेद्याचा प्रसाद ग्रहण करितों. कारण, तसें केल्यानें मुलें होतात, हें तुह्मी जाणतच अहात! असा विधी आटोपून आह्मीं स्वस्थ निजतों. वगैरे प्रकारचा जो काय त्या दोघां स्त्रीपुरुषांचा नित्यें क्रम होता, त्याची तिनें सविस्तर हकिकत त्यास सांगितली. ती ऐकूनच विचित्रपालास जें हांसूं येऊं लागलें होतें तें कांहीं केल्या आवरेना. थोड्या वेळानें त्यानें आपलें हांसूं आवरून, त्यावेळीं घडलेला प्रकार कोणाजवळ न बोलण्याविषयीं बजावून, तिच्या खऱ्या सुखार्थ नवांत व एकांतीं भेटण्याविषयींचें वचन घेतलें.

संकेतानुरूप त्या स्वार्थपटु जादुगाराची व **रतिसुंदरीची** पुनः एकांतीं गांठ पडल्यावर, त्यानें तीस नानाप्रकारें कामदेवाचें पूजन करण्याचें शिकविलें व तिच्या भ्रताराची निर्बल आवस्था तिच्या मनांत ठासठासून भरविली. त्याच्या रंगेल पूजनांपासून अर्थात तीस अति सुख होऊं लागल्याकारणानें व प्रेम हें स्त्रीची केवळ जिवनकला असल्यामुळें, ती त्या नीच मनुष्यावर प्राणापेक्षांही अधिक प्रीती करूं लागली. परंतु कित्येक प्रकारचें ज्ञान हें कधीं कधीं मनुष्याच्या दुःखासच कारणीभूत होतें याचा अनुभव तीस आला.

याप्रमाणें **रतिसुंदरीचें** व **विचित्रपालाचें** प्रेमरहस्य जुगल्यास सात आठ दिवस झाले नाहींत, तोंच त्या मोहक जादूगाराचें खरें नांव, त्याचें यथंभूत पूर्व चरित्र वगैरे सर्व हकिकत **दयाघनास** समजली. **विचित्रपालाची** पेटींतून मुक्तता झाल्यावर त्या ठिकाणचें साहित्य व त्यास पुरलेली ती पेटी उकरलेली एका, शेतकऱ्यास दुसरे दिवशीं आढळली, त्यानें तो प्रकार सरकारी अधिकाऱ्यांस

कळविला. शिवाय ज्या लोकांनीं त्याचें प्रेत उकरलें होतें, तेही आपल्या इष्टमित्रांस असें सांगूं लागले कीं, विचित्रपाल आपल्या जादूविद्येच्या अद्भूत प्रभावानें पुरला असतांही एकमासानें पुनः जिवंत होऊन निघून गेला. तीही गोष्ट सरकारी अधिकाऱ्यांच्या कानीं जाऊन, ते त्यास पुनः पकडून शासन देण्यासस्तव त्याच्या शोधास लागले. ज्यावर ही कामगिरी सोपविली होती, त्यापैकीं कित्येकजण विजयपुरीस आले. तेथें त्यास तो मोहक जादुगार दयाधनाच्या वाड्यांत असल्याची बातमी लागल्यावरून त्यांनीं त्याचीं सर्व अति नीच कर्मे त्यास सांगितली. परंतु ती बातमी विचित्रपालास समजल्यावरून तो कोठें एकाएकी नाहींसा झाला.

घरजावयाचें आयुष्य अत्यंत पराधीन असतें. त्यास निरंतर आपल्या स्त्रीच्या आर्जवांतच रहावें लागतें. त्यांतून तो घरजांवई पुसकल रहीत असल्यास तर त्याची दुर्दशा विचारावयासच नको! विचित्रपालानें स्त्री पुरुषांच्या संगती सुखाचें खरें वर्म रतिसुंदरीस शिकवितांच ती आपल्या निर्बळ भ्रतारास अगदींच जुमानीशी झाली. ती मनसोक्त आचरण करण्यास लागली होती. तथापि निर्बल मनुष्यास आपली स्त्री जारकर्मीं रत झाली आहे, असें जरी समजलें, तरी त्यास दुःख होत नाहीं. बिचाऱ्या दुर्दैवी रतिसुंदरीस मात्र सुख प्राप्तीचें खरें तत्त्व समजल्यापासून तिच्या मनाची शांतता नष्ट झाली. तीस वारंवार त्यास पहावेसें, त्याशीं बोलावेसें व त्याची थट्टा करावीशी वाटे. तथापि आपल्या सुखाचें व प्रेमाचें खरें रहस्य कोणाच्या लक्षांत येऊं नये एतदर्थ निरंतर दक्षता ठेवावीसें वाटे. त्यांतून त्या विचित्र जादूगाराचीं कृष्ण कारस्थानें लोकांस कळाली व एकाएकी तो नाहींसा झाला, तेव्हां तर तिला जें अनिवार दुःख होऊं लागलें होतें, त्याची कल्पना पुरुषास होणें अशक्य होय. त्या दिवशीं रात्रीं सर्वत्र घरांत निजानिज होऊन शांतता आल्यावर ती अल्लड प्रेमळ सुंदरी आपल्या मनांतील प्रेमाच्या पवित्र दुःखास निर्बंधीत यथेच्छ ओघ देण्यास्तव एकटीच बागेंत जाऊन बसली शोकांत निमग्न होऊन गेली.

इकडे विचित्रपालास आपणास राजाचें धरणें आल्याचें समजतांच तो प्रथम कोणाचे दृष्टीस न पडतां अरण्यांत छपून बसून

विचार करूं लागला असतां त्यास वाटलें कीं, रतिसुंदरीप्रमाणें रसाळ ग्रास आपल्या हातीं चढला असून, तीस गटकन गिळिल्याशिवाय येथून निघून गेल्यास आपल्या त्रिदाम व पराक्रमास लांच्छन लागेल. यास्तव त्यानें गुप्तरीतीनें तीस भेटण्याचा विचार केला.

ती सुंदरी बागेंत शोक विव्हळ होऊन बसली होती. त्या समयीं मध्यान रात्रीचा सुमार होता. जिकडे तिकडे शांतता होती; तथापि चांदणें स्वच्छ पडलें असून, सभोंवतील सर्व झाडें, झुडपें, वेली व पुष्पें अत्यंत तेजस्वी व टवटवीत दिसत होती, तरी त्यावेळीं त्या सुंदर बागेंत सर्वांत अति सकुमार व मोहक जी लावण्यलतिका होती, ती अतिशय कोमेजलेली अशी दिसत होती. तिचें सुंदर मुखकमल अत्यंत म्लान झालें होतें; तिच्या मनोहर नेत्रांतून मौक्तिकवत् टपटपा अश्रुपात होत होते, ती वारंवार उष्ण व दीर्घ श्वासोश्वास टाकीत होती. अशी तिची स्थिती विचित्रपालानें झाडा आडून लपून पाहून त्यास अत्यानंद झाला. त्यांस वाटलें कीं, आतां आपला उद्देश शेवटास जाण्यास कांहींच प्रयास पडावयाचे नाहींत. ह्मणून त्यानें जाऊन तिच्या कंठास मिठी मारली. त्यासमयीं तिनें जो आनंद प्रदर्शित केला त्याची कल्पना वाचकांनींच करावी.

थोड्या वेळानें ती जरा शांत झाल्यावर तो कपटपटु जादुगार तीस ह्मणाला, प्रिये पूर्व जन्म कर्म, धर्मसंयोगेंकरून तुझी माझी गांठ पडून विशेष प्रसंग घडला. परंतु माझ्या दुर्दैवेंकरून माझ्या शत्रूंनीं माझ्यावर अनेक वृथा आरोप आणून माझा नानाप्रकारें छल मांडिला आहे. यास्तव आतां मला तुझ्यासारख्या अमोल रत्नाची आशा सोडून दूर देशीं जाणें भाग पडलें. याकरितां मी आतां तुझी शेवटली भेट घेण्यास आलों आहे. त्याचें हें मायावी भाषण ऐकून ती अल्लड बाला ह्मणाली, प्राणनाथ हें काय आपलें भाषण? तुमचे येथें रहाणें होणें अशक्य असल्यास मीही तुमच्याबरोबर येणार! मी कधींही राहणार नाहीं! तेव्हां तो दांभिक जादुगार तीस म्हणाला, तूं या राजलक्ष्मीचा, प्रेमळ माता पितरांचा, विवाहीत भ्रताराचा व लौकीक विचाराचा त्याग करून माझ्याप्रमाणें भिकाऱ्याबरोबर भणक्या मारण्यास व नानप्रकारच्या दारिद्र्याच्या यातना भोगण्यास येते ह्मणतेस याचा अर्थ काय? असा भलताच छंद घेऊन बसूं

नको! कांहीं तरी थोडा विचार कर! हें मायावी भाषण ऐकून ती भोळी सुंदरी ह्मणाली प्राणवल्लभा माझें जें प्रेम तुह्मावर बसलें आहे त्यास सामाजिक निर्बंधाचा, इतर प्रेमसंबंधाचा संपत्तीसुखाचा बिलकूल विचार होत नाहीं. माझ्या प्रेमास अंतःकरणाच्या अति नाजूक व पवित्र बंधाचा मात्र विचार आहे. आत्म्याच्या अति निष्कलंक व गंभीर बंधाची केवळ कल्पना आहे. जरी मानवी विचाराच्या तत्वाच्या कायद्यानें मी दुसऱ्याची स्त्री झालें असें अल्पदृष्टी मनुष्यास वाटतें तरी तुमच्याशिवाय दुसरे कोणीही मला स्पर्श केला नाहीं. व काया वाचा मनेकरून मी तुमची स्त्री झाले हें सृष्टी नियंतापूर्णपणें जाणत आहे. यास्तव त्या सृष्टी चालकाच्या साक्षीनें अनन्यभावें मी आपलें तन मन धन तुह्मांस अर्पण केलें आहे. माझ्या अंगावर लाख पन्नास हजार रुपयांचे दागिने आहेत. ते आपणा उभयतांस ज्या ठिकाणीं तुमच्या शत्रूंच्या उपसर्ग लागणार नाहीं, अशा दूरदेशाच्या एकांत स्थलीं रहाण्यास जन्मभर सहज पुरतील. यास्तव असें स्थल जेथें तुह्मांस आढळेल तेथें जाऊन राहून शांततेंत आयुष्याचे दिवस कंठू. असें त्या भोळ्या सुंदरीचें भाषण ऐकून त्या कपटपटू जादुगारास अत्यानंद झाला. नंतर ती उभयतां लगेच तेथून दिल्लीस निघून गेली. तेथें त्यानें अल्प काळांतन तिच्या सर्व दागिन्यांचा फन्ना उडविला. नंतर त्या चांडाळानें ती नानापरी शोक विव्हळ झाली असतांही त्याकडे बिलकूल लक्ष न देतां, तेथील एका वेश्येस तीस विकून टाकले. त्यानंतर लौकरच तो दुष्ट अमरावतीच्या राजाच्या हेरांच्या हातीं लागल्यामुळें, हालहाल करून त्यास ठार मारण्यांत आले. याप्रमाणें बाईसाहेब पुरुषांवर प्रेम करून त्यांच्यावर विश्वास टाकिला असतां, ते स्वार्थपटु नीच जादुगार आह्मांस व्यसनीं गोवून फसवितात. अशा अनेक गोष्टी मागें घडल्या, हल्ली घडतात व यापुढेंही घडतील, यापेक्षां पुरुषांच्या नीचपणाची एक गोष्ट माझी सखी राधिका हीस माहित आहे ती तुह्मांस सांगेल:—